* पारंपरिक पुस्तकांपेक्षा व्हिल्युअल आणि ऑडिओ माध्यमांद्वारे शिकणे सोपे होते.
* डिजिटल स्टोरीटेलिंगमुळे विषय अधिक प्रभावीपणे समजावून सांगता येतो.

९) व्यक्तिमत्व विकास आणि करिअर संधी :–

Linkdin, Medium, Twitter सारख्या प्लॅटफॉर्म्सवर प्रोफेशनल नेटवर्किंग आणि करिअर मार्गदर्शन मिळते.

* ऑनलाईन कोर्सेस आणि प्रमाणपत्रे (Certificates) मिळवून विद्यार्थ्यांना नोकरीसाठी अधिक चांगल्या संधी मिळू शकतात.
* नोकरी आणि इंटर्नशिपच्या संधी शोधण्यासाठी समाज माध्यमांचा मोठा उपयोग होतो.

१०)सामाजिक आणि नैतिक जाणीव निर्माण करणे :–

* समाज माध्यमांवर शैक्षणिक संस्था आणि विद्यार्थी विविध सामाजिक विषयांवर चर्चा करू शकतात.
* पर्यावरण, विज्ञान, आरोग्य आणि इतर महत्वाच्या मुद्यांबद्दल जागरूकता वाढते.
* विद्यार्थ्यांमध्ये जबाबदारीची भावना आणि सामाजिक बांधिलकी निर्माण होते.

विद्यार्थ्यांसाठी समाज माध्यमांची भूमिका

*** शिकण्याच्या संधी विस्तारित करणे –**

यूट्यूब कोर्सस, स्वयम आणि अन्य ई– लर्निंग प्लॅटफॉर्ममुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या शंका विचारु शकतात आणि तत्काळ उत्तरे मिळवू शकतात. अनेक शिक्षक आणि अभ्यासू विद्यार्थी या प्लॅटफार्मवर सक्रिय असतात.

*** स्पर्धा परिक्षांसाठी तयारी –**

यूपीएससी, एमपीएससी, नेट सेट बँकिंग आणि इतर स्पर्धा परिक्षांसाठी समाज माध्यमावर अनेक मोफत स्रोत उपलब्ध आहेत. युट्युब आणि टेलिग्राम वरील मार्गदर्शक चॅनेल्स विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरतात.

*** नवीन संशोधन व अपडेट्स मिळवणे –**

इन्स्टाग्राम, ट्विटर आणि फेसबुकवरील शैक्षणिक पेजेसद्वारे विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षेत्राशी संबंधित ताज्या घडामोडी आणि संशोधनाविषयी माहिती मिळते.

अश्विनी राजेंद्र राखुंडे
बी.एस्सी. भाग–२

***

सावित्री

थोर ती सावित्री
जिने लेकी घडविल्या,
ज्ञान देऊन मुलींना
ज्ञानज्योती पेटविल्या.

पावलोपावली दिली तिने
साथ ज्योतीबाची,
प्रत्येकाशी जुळवली तिने
नाती रक्ताची.

मुलींना शिकवले किती
सोसूनी त्रास,
ज्ञानाचा प्रसार करून
दाविली दिशा समाजास.

प्रत्येक अनाथाची माय
ठरली सावित्री,
शेवटपर्यंत मुलींच्या हक्कांसाठी
लढली सावित्री.

थोरवी वर्णावी जिची
पडतील शब्दही लहान,
अशी होती सर्वांची
सावित्री महान

कार्तिकी विनोदराव तळवेकर
बी.एस्सी. भाग–२

शाश्वत शेतीच्या दृष्टीने नवा प्रयोग

शाश्वत शेती ही एक अशी पद्धत आहे, जी पर्यावरण, समाज आणि अर्थव्यवस्थेला नुकसान न करता दीर्घकालीन उत्पादनक्षमतेसाठी उपयुक्त असते. शाश्वत शेती म्हणजे केवळ पर्यावरणाच्या रक्षणावरच आधारित असलेली शेती नसून, त्या शेतीच्या माध्यमातून समाजाची, शेतकऱ्यांची आणि स्थानिक अर्थव्यवस्थेची प्रगती देखील साधता येईल असे एक मॉडेल आहे.

सध्याच्या काळात, शेती क्षेत्राला विविध समस्यांचा सामना करावा लागतो. वाढती लोकसंख्या, जागतिक तापमानवाढ, कमी होणारे जलस्त्रोत, औद्योगिकीकरणामुळे होत असलेले पर्यावरणीय बदल इत्यादींमुळे पारंपरिक शेती पद्धतींना धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे शाश्वत शेतीच्या दृष्टिकोनातून नव्या प्रयोगांची आवश्यकता वाढली आहे.

शाश्वत शेती म्हणजे काय ?

शाश्वत शेती म्हणजे अशी शेती जी नैतिक, पर्यावरणीय आणि आर्थिकदृष्ट्या टिकाऊ आहे. यामध्ये नैतिकदृष्ट्या शेतकऱ्यांसाठी फायदेशीर असलेल्या उत्पादन पद्धती, पर्यावण रक्षणाच्या दृष्टीने चांगले असलेले उपाय आणि सामाजिकदृष्ट्या योग्य अशी प्रणाली वापरली जाते. शाश्वत शेतीच्या पध्दतीमध्ये जैविक शेती, विविधता वाढविणे, जलसंधारण, मातीच्या आरोग्याचे रक्षण आणि पिकांच्या नैसगिक नियंत्रणासाठी विविध जैविक उपायांचा समावेश होतो.

शाश्वत शेतीच्या दृष्टीने नव्या प्रयोगांची आवश्यकता :–

१. जैविक शेती :–

जैविक शेती ही शाश्वत शेतीच्या दृष्टिकोनातून सर्वात महत्त्वाची आहे. पारंपरिक शेतीमध्ये रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो. जैविक शेतीमध्ये रासायनिक पदार्थाचा वापर टाळला जातो, यामुळे मातीचे आरोग्य टिकवल्या जातो आणि पर्यावरणाची हानी कमी केली जाते. त्याचबरोबर शेतकऱ्यांना निसर्गावर अवलंबून राहून पिकांचे उत्पादन मिळवता येते.

२. जलसंधारणाचे उपाय :–

शाश्वत शेतीमध्ये जलसंधारण हा एक महत्त्वाचा मुद्दा आहे. भारतात अनेक भागांमध्ये पाणीटंचाईची समस्या आहे. यासाठी पाण्याच्या पुनर्वापरासाठी विविध उपाय सुचवले जात आहेत. पाऊसपाणी संकलन, ड्रिप इरिगेशन प्रणाली आणि पाणी वापराच्या शास्त्रशुद्ध पद्धती वापरून पाण्याचा बचाव केला जातो. या उपायांमुळे पिकांना आवश्यक पाणी वेळेवर मिळते आणि जलस्त्रोतांचे संरक्षण होते.

३. विविधता आधारित शेती :–

पारंपरिक शेती पद्धतीमध्ये एकाच प्रकारच्या पिकांची लागवड केली जाते. त्यामुळे मातीच्या आरोग्यावर आणि जैवविविधतेवर वाईट परिणाम होतो. शाश्वत शेतीमध्ये विविध पिकांची लागवड केली जाते. जी मातीला पोषण मिळवून देण्यास मदत करते आणि कीटक व रोगांचे नियंत्रण नैसर्गिक पद्धतीने करते. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या फायदेशीर उत्पादन मिळते.

४. मातीचे आरोग्य राखणे :–

शाश्वत शेतीत मातीचे आरोग्य राखण्यासाठी वेगवेगळ्या पद्धती वापरण्यात येतात. मातीचे आरोग्य राखण्यासाठी अजैविक किंवा रासायनिक खतांचा वापर टाळून जैविक खतांचा वापर केला जातो. यामुळे मातीचे पोषण संतुलित राहते आणि तिच्या उत्पादनक्षमतेत वाढ होऊ शकते.

५. तंत्रज्ञानाचा वापर :–

आजच्या युगात तंत्रज्ञानाचा वापर शाश्वत शेतीमध्ये महत्त्वपूर्ण ठरु शकतो. विविध प्रकारच्या सेन्सर्स, डेटा ॲनालिटिक्स, ड्रोन तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता वापरुन शेतकऱ्यांना त्यांचे शेत व्यवस्थापन अधिक कार्यक्षमपणे करता येते. यामुळे पिकांचे उत्पादन जास्त होऊ शकते, परंतु पर्यावरणावरही कमी दबाव पडतो.

शाश्वत शेतीमध्ये नव्या प्रयोगांचे फायदे :–

१. पर्यावरणीय फायदे :–

शाश्वत शेती पर्यावरण्याच्या दृष्टिकोनातून अत्यंत फायदेशीर आहे. जैविक शेतीमुळे मातीची गुणवत्ता आणि जैवविविधता वाढवता येते. जलसंधारण आणि पाणी व्यवस्थापनाच्या उपायामुळे जलस्त्रोतांचे संरक्षण होते, तसेच कमी पाणी वापरून अधिक उत्पादन मिळवता येत.

२. शेतकऱ्यांच्या जीवनमानातील सुधारणा :–

शाश्वत शेतीचे आणखी एक महत्त्वाचे फायदे म्हणजे शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारते. रासायनिक पदार्थाचा वापर टाळल्यामुळे त्यांची आरोग्य समस्या कमी होऊ शकते. त्याचबरोबर, दीर्घकालीन पद्धतींचा वापर केल्याने त्यांना टिकाऊ आणि दीर्घकालीन उत्पन्न मिळते.

३. कमी उत्पादन खर्च :–

शास्वत शेतीत केवल नैतिक पद्धतींचाच वापर केला जातो. म्हणून उत्पादन खर्च कमी होतो. रासायनिक खतांचा वापर कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांचे खर्च कमी होतात आणि यामुळे त्यांचे आर्थिक फायदे अधिक होतात.

शाश्वत शेतीच्या भविष्याबद्दल :–

शाश्वत शेती ही एक भविष्यकाळातील महत्त्वाची पध्दत आहे. विविध प्रगतीशील तंत्रज्ञान, नव्या शेती पद्धती आणि पर्यावरणीय विचारांवर आधारित उपायांचा वापर करून शाश्वत शेतीने शेती क्षेत्राची समस्या सोडवू शकते. सरकार शेतकरी आणि संशोधक यांचे एकत्रित सहकार्य असलेले शाश्वत शेतीच्या भविष्याच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे.

सेजल नरेंद्र ताजणे
बी.एस्सी. भाग–२

***

समाज माध्यमांची शिक्षण क्षेत्रात भूमिका

समाज माध्यमे ही आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगातील एक महत्त्वाची शक्ती बनली आहे. फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, युट्यूब, लिंक्डइन आणि व्हॉट्सअप यासारखी अनेक समाज माध्यमे आहे. ही माध्यमे आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत. शिक्षण क्षेत्रातही समाज माध्यमांचा प्रभाव झपाट्याने वाढत आहे. माहितीची देवाण–घेवाण, संवाद, सहकार्य, ऑनलाईन शिक्षण, नवीन संकलन प्रसार यासाठी समाज माध्यमांचा उपयोग मोठ्या प्रमाणावर होऊ लागला आहे. त्यामुळे समाज माध्यमे ही केवळ करमणुकीचे साधन राहिली नसून शिक्षणाचा एक महत्वाचा भाग बनली आहेत.

समाज माध्यमांच्या शिक्षण क्षेत्रातील उपयोग

१. माहितीचा वेगवान प्रसार

पुर्वीच्या काळात माहिती मिळवण्यासाठी पुस्तकांवर आणि ग्रंथालयांवर अवलंबून राहावे लागे. मात्र, समाज माध्यमांमुळे माहितीचा प्रसार काही क्षणांत होऊ शकतो. शैक्षणिक संस्थांनी स्वत:चे पेजेस आणि ग्रुप्स तयार करुन त्यावर शैक्षणिक सामृग्री शेअर करणे सोपे झाले आहे. तसेच, विद्यार्थ्यांना आवश्यक ती अध्ययनसामग्री पटकन उपलब्ध होते.

२. ऑनलाईन शिक्षण आणि ई–लर्निंग

कोरोना महामारीच्या काळात ऑनलाईन शिक्षणाचे महत्व वाढले. झूम, गूगल मीट, यूट्यूब आणि टेलीग्राम यासारख्या माध्यमांद्वारे शिक्षक आणि विद्यार्थी एकमेकांशी संवाद साधू लागले. अनेक महत्त्वाचे कोर्सेस आणि शिकवणी वर्ग ऑनलाईन उपलब्ध होत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही दर्जेदार शिक्षण घेण्याची संधी मिळू लागली आहे.

३. शैक्षणिक चर्चासत्रे आणि गटचर्चा

समाज माध्यमांवर शैक्षणिक गट तयार करून विषयांवर चर्चा करणे सोपे झाले आहे. व्हॉट्सॲप आणि फेसबुक ग्रुप्समध्ये विद्यार्थी आणि शिक्षक परस्परसंवाद साधू शकतात. त्यामुळे शंका समाधान पटकन होते आणि नवीन दृष्टिकोन तयार होतो.

४. स्पर्धा परीक्षा आणि करिअर मार्गदर्शन

यूपीएससी, एमपीएससी, बँकिंग, एसएससी, रेल्वे परीक्षा अशा अनेक स्पर्धा परीक्षांसाठी समाज माध्यमे खूप उपयुक्त ठरली आहेत. यूट्यूबवरील मोफत मार्गदर्शन, टेलीग्रामवरील नोट्स आणि महत्त्वाच्या परीक्षांच्या अपडेट्स यामुळे विदयार्थ्यांना वेळोवेळी मदत मिळते.

५. सर्जनशीलता आणि नवसंशोधनाला चालना

समाज माध्यमांमुळे विदयार्थ्यांना आपली सर्जनशीलता दाखवण्याची संधी मिळते. ब्लॉग लेखन, व्हिडीओ कंटेंट तयार करणे, ऑनलाईन प्रकल्प सादर करणे यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवीन कौशल्ये विकसित होतात. तसेच, विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील संशोधन समाज माध्यमांद्वारे अधिक सहज पसरते.

६. शिक्षक – विद्यार्थी परस्परसंवाद

समाज माध्यमांमुळे शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील अंतर कमी झाले आहे. यूटयूब आणि अन्य शिक्षणविषयक प्लॅटफॉर्मवर शिक्षक आपले व्हिडीओ अपलोड करतात, जे विद्यार्थी कधीही पाहू शकतात. तसेच, थेट प्रश्न विचारण्यासाठी सोशल मिडिया ग्रुप्सचा उपयोग केला जातो.

समाज माध्यमांच्या मर्यादा आणि तोटे

१. गैरवापर आणि दिशाभूल करणारी माहिती

समाज माध्यमांवर चुकीची किंवा अपूर्ण माहिती सहज पसरते. विद्यार्थी अशा माहितीवर विश्वास ठेवून चुकीच्या गोष्टी शिकण्याचा धोका असतो. त्यामुळे योग्य स्त्रोतांवर विश्वास ठेवणे महत्त्वाचे आहे.

२. वेळेचा अपव्यय

समाज माध्यमांचा उपयोग शिक्षणासाठी झाला तरी त्याचा अतिरेक झाल्यास विद्यार्थ्यांचा वेळ वाया जाऊ शकतो. गरजेपेक्षा जास्त वेळ सोशल मिडियावर घालवल्यास अभ्यासाकडे दुर्लक्ष होऊ शकते.

३. गुप्तता आणि सायबर सुरक्षेचा अभाव

समाज माध्यमांवरील वैयक्तिक माहिती सुरक्षित

ठेवणे ही मोठी जबाबदारी असते. विद्यार्थ्यांना फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

४. व्यक्तिगत संवाद कमी होणे

ऑनलाईन शिक्षणामुळे प्रत्यक्ष संवाद कमी होत आहे. यामुळे विद्यार्थी एकमेकांशी आणि शिक्षकांशी कमी संवाद साधतात. यामुळे सामाजिक कौशल्ये कमी होण्याचा धोका असतो.

उपाय आणि निष्कर्ष

समाज माध्यमांचा योग्य उपयोग झाला तर ते शिक्षणाच्या क्षेत्रात मोठी क्रांती घडवु शकतात. विद्यार्थ्यांनी समाज माध्यमांचा अभ्यासासाठी शिस्तबद्ध वापर करावा. शिक्षकांनीही योग्य मार्गदर्शन देऊन समाज माध्यमांचा सकारात्मक उपयोग कसा करावा हे शिकवले पाहिजे.

निष्कर्ष

समाज माध्यमे ही आधुनिक शिक्षणाच्या दृष्टीने वरदान ठरली आहेत. योग्य पद्धतीने वापर केल्यास समाज माध्यमे विद्यार्थ्यांसाठी खूप फायदेशीर ठरू शकतात. मात्र, त्याचा अतिरेक आणि गैरवापर टाळणे गरजेचे आहे. शिक्षण क्षेत्रात समाज माध्यमांचा प्रभाव अधिक वाढत असून भविष्यात शिक्षण अधिक परिपूर्ण आणि सर्वसमावेशक होण्यास मदत होईल.

आदित्य भातकुलकर
बी.एस्सी. भाग–२

***



डॉ. मनमोहन सिंह यांचा भारतीय अर्थव्यवस्थेकडे पाहण्याचा दृष्टिकोन

भारताच्या अर्थव्यवस्थेचा एक अत्यंत महत्त्वाचा आणि ऐतिहासिक टप्पा म्हणजे १९९१ सालचा अर्थसुधारणा काळ. याचे श्रेय ज्येष्ठ अर्थतज्ञ आणि भारताचे माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंह यांना जाते. डॉ. मनमोहन सिंह यांच्या नेतृत्वात भारताने जागतिक आर्थिक क्षेत्रात आपली स्थिती दृढ केली आणि देशाच्या विकासासाठी एक नवी दिशा ठरवली. त्यांचा भारतीय अर्थव्यवस्थेकडे पाहण्याचा दृष्टिकोन, त्यांचे विचार आणि धोरणे आजही भारतीय अर्थव्यवस्थेच्या यशस्वी युगात महत्त्वाची भूमिका बजावतात.

डॉ. मनमोहन सिंह हे एक सखोल अर्थतज्ञ होते. त्यांनी भारताच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारे धोरणे तयार केली. १९९१ मध्ये भारतात अर्थसुधारणा लागू करण्यात आली, त्यावेळी डॉ. मनमोहन सिंह हे अर्थमंत्री होते. त्यावेळी भारताच्या अर्थव्यवस्थेला गंभीर संकटाचा सामना करावा लागला होता. परकीय चलनाचा तुटवडा, मंदी, सरकारी खात्यातील जास्त कर्ज आणि विविध आर्थिक अडचणी या समस्याचा सामना करत भारताला एक नवा मार्ग ठरवण्याची आवश्यकता होती.

डॉ. मनमोहन सिंह यांनी भारतीय अर्थव्यवस्थेच्या सुधारणेसाठी जी धोरणे स्विकारली, ती आजही महत्त्वपूर्ण ठरतात. त्यांनी १९९१ मध्ये जी आर्थिक सुधारणा आणली, त्याचे मुख्य उद्दीष्ट हे होते की भारतीय अर्थव्यवस्थेला जागतिक स्पर्धेच्या पातळीवर आणणे. त्यासाठी त्यांनी उघड व्यापार धोरण, खासगीकरण, विदेशी गुंतवणुकीस प्रोत्साहन, कर प्रणालीतील सुधारणा आणि बँकींग क्षेत्रातील बदल यावर जोर दिला.

मनमोहन सिंह यांचा विश्वास होता की आर्थिक विकास हा फक्त देशाची आर्थिक स्थिती सुधारतोच, परंतु तो लोकांची जीवनशैली देखील सुधारतो. त्यांचा दृष्टिकोन असा होता की, 'आर्थिक सुधारणांनी एक समृद्ध राष्ट्र निर्माण करणे हेच मुख्य लक्ष्य असले पाहिजे'. देशाच्या आर्थिक विकासामध्ये सरकारची भूमिका ही एक प्रोत्साहक आणि मार्गदर्शक असायला हवी.

त्यांनी भारतात 'नवीन आर्थिक धोरण' लागू करत व्यापारावर बंदी कमी केली. त्यांनी निर्याताला चालना दिली, परकीय गुंतवणुकीला अनुमती देऊन आणि भारतीय उद्योगांना जागतिक पातळीवर स्पर्धात्मक बनवले. या सुधारणांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेची स्थिती सुधारली आणि भारताला आर्थिक वाढीसाठी एक नवा मार्ग मिळाला. विशेषत: मनमोहन सिंह यांचा दृष्टिकोन भारतातील 'शाश्वत विकास' वरही केंद्रित होता.

मनमोहन सिंह यांचे एक महत्त्वाचे तत्व म्हणजे 'विकसनशील देशांचा आर्थिक विकास हा मुख्यतः त्याच्या आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या धोरणावर आणि त्याच्या उद्योग

क्षेत्रावर अवलंबून असतो.' त्यांची आर्थिक धोरणे हे शाश्वत आणि सतत विकासावर आधारित होती. भारतीय अर्थव्यवस्थेच्या सध्याच्या दृष्टिकोनात, हे विचार आजही लागू होतात.

मनमोहन सिंह यांच्या विचारांमध्ये सामाजिक न्यायाची अंमलबजावणी देखील महत्त्वाची होती. त्यांचा विश्वास होता की, आर्थिक प्रगती ही एकल ठिकाणी केली जाऊ नये, तर ती समग्र समाजासाठी केली जावी. त्यांना याचे भान होते की, जर देशाच्या प्रत्येक नागरिकाला प्रगतीची संधी दिली, तरच एक सशक्त आणि समृद्ध राष्ट्र तयार होईल.

आजच्या काळात डॉ. मनमोहन सिंह यांचा भारतीय अर्थव्यवस्थेवर प्रभाव अजूनही स्पष्टपणे दिसतो. १९९१ साली ज्या प्रारंभिक सुधारणा झाल्या, त्यांचा परिणाम आजही दिसतो. त्यांचा आर्थिक दृष्टिकोण आणि धोरणे भारतीय अर्थव्यवस्थेसाठी एक प्रेरणा बनले आहेत. त्यांचा विश्वास होता की भारताने त्याच्या राष्ट्रीय संसाधनांचा प्रभावीपणे वापर करून जागतिक पातळीवर आपले स्थान स्थिर करायला हवे.

मनमोहन सिंह यांचा अर्थशास्त्रातील अभ्यास आणि तज्ञता यामुळे ते एक सशक्त आणि विचारशील नेते म्हणून ओळखले जाते. १९९१ मध्ये त्यांनी वित्तमंत्री म्हणून कार्यभार स्विकारल्यानंतर त्यांनी भारतीय अर्थव्यवस्थेला सुधारण्यासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले, भारतीय अर्थव्यवस्थेची दिर्घकालीन मंदी आणि चांगल्या विकासाची आवश्यकता लक्षात घेत त्यांनी विविध सुधारणा आणल्या.

१) १९९१ चा अर्थसुधारणा कार्यक्रम

मनमोहन सिंह याचा १९९१ चा अर्थसुधारणा कार्यक्रम भारतीय अर्थव्यवस्थेतील मैलाचा दगड ठरला. १९९१ मध्ये भारताला गंभीर आर्थिक संकटाचा सामना करावा लागला होता. या संकटातून बाहेर पडण्यासाठी त्यांनी विविध पावले उचलली. त्यामध्ये मुक्त व्यापार धोरण, निर्यात प्रोत्साहन, परकीय भांडवल आकर्षित करण्यासाठी धोरणात्मक बदल यांचा समावेश होता.

२) मुक्त बाजारपेठेचे स्वागत

मनमोहन सिंह यांनी भारतीय अर्थव्यवस्थेतील संरक्षणवादी धोरण बदलले. पूर्वी भारताने आपल्या बाजारपेठेचे इतर देशांपासून संरक्षण केले. तथापि सिंह यांच्या दृष्टिकोनानुसार भारताला जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी खुल्या आणि मुक्त बाजारपेठेची आवश्यकता होती. त्यांनी आयात शुल्क कमी केले आणि विदेशी गुंतवणूक आकर्षित केली. त्यामुळे भारताच्या उत्पादन क्षेत्राने चांगली प्रगती केली. तसेच नव्या तंत्रज्ञानाच्या वापारामुळे उद्योग क्षेत्रामध्ये सुधारणा झाली.

३) भारताच्या अर्थव्यवस्थेचे दिर्घकालीन दृष्टिकोन

मनमोहन सिंह यांचा दृष्टिकोन कधीही तात्कालिन सुधारणा करण्यापेक्षा दिर्घकालीन स्थिरतेवर अधिक केंद्रित होता. त्यांनी विविध आर्थिक सुधारणासह भारताच्या वित्तीय बाजारपेठेतील पारदर्शकता आणि स्थिरतेचे महत्त्व वाढवले. त्यांचा दृष्टिकोन होता की, भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर एक प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून प्रस्थापित करण्यासाठी आर्थिक दिर्घकालीन दृष्टिकोनातून बनविले पाहिजेत.

डॉ. मनमोहन सिंह यांचा भारतीय अर्थव्यवस्थेकडे पाहण्याचा दृष्टिकोन केवळ तात्कालिक सुधारणांपर्यंत मर्यादित नव्हता, तर तो दिर्घकालिन आर्थिक स्थिरतेवर आधारित होता. त्यांच्या नेतृत्वाखाली भारतीय अर्थव्यवस्थेने जागतिकीकरण बाजारपेठ आणि परकीय गुंतवणूक स्वीकारले, परिणामी भारत जागतिक स्तरावर एक सशक्त आणि स्पर्धात्मक अर्थव्यवस्था बनला. त्यांचा दृष्टिकोन आणि निर्णय हे भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी अनमोल ठरेल.

स्वतंत्र भारताच्या आर्थिक इतिहासातील मानल्या जाणाऱ्या १९९१–१९९६ याच पाच वर्षाच्या काळात डॉ. सिंह यांनी भारताचे अर्थमंत्रिपद भूषविले. भारताच्या आर्थिक सुधारणा अमलात आणण्यासाठी आवश्यक असलेले सर्वकष धोरण तयार करण्यात सिंह यांची भूमिका जगभरात नावाजली जाते. हा काळ डॉ. मनमोहन सिंह यांच्या नावाशी घट्ट जोडला गेला आहे.

डॉ. मनमोहन सिंह यांनी भारतीय अर्थव्यवस्थेचा उद्धार करण्यासाठी अनेक पावले उचलली. त्यांनी अर्थव्यवस्थेचे उदारीकरण आणि खुलीकरण करण्यावर भर दिला. यामुळे भारतीय अर्थव्यवस्था जगातील इतर अर्थव्यवस्थेशी जोडली गेली आणि भारताला जगातील एक प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून ओळख मिळाली.

आचल जानराव भलावी
बी.एस.सी. भाग–२

बदलत्या काळातील तरुणांचे मानसिक आरोग्य

मानसिक आरोग्य हा कोणत्याही व्यक्तीसाठी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. शरीर आरोग्याइतकेच मानसिक आरोग्य देखील जीवनात यशस्वी आणि आनंदी राहण्यासाठी गरजेचे असते. आजच्या आधुनिक आणि तंत्रज्ञानप्रधान युगात मानसिक आरोग्याचा विषय अधिक गंभीर होत चालला आहे विशेषतः तरुण वर्ग हा या बदलत्या काळाचा सर्वाधिक प्रभाव घेणारा गट आहे. शिक्षण, करीअर, सामाजिक अपेक्षा, नातेसंबंध आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे तरुणांवर विविध प्रकारचे मानसिक दडपण येत आहे. बदलत्या काळानुसार तरुणांची जीवनशैली, विचारसरणी आणि मानसिकता मोठ्या प्रमाणात बदलत आहे. तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव, शिक्षणातील स्पर्धा, सामाजिक अपेक्षा आणि करीअरच्या दडपणामुळे तरुणांच्या मानसिक आरोग्यांवर मोठा परिणाम होत आहे. या सर्व गोष्टीमुळे अनेक तरुण नैराश्य, चिंता, तणाव यासारख्या मानसिक समस्यांना समोरे जात आहेत.

आजच्या आधुनिक युगात तंत्रज्ञान आणि विज्ञानाने प्रचंड प्रगती केली आहे. त्यामुळे जीवनशैलीत आमुलाग्र बदल झाले आहे. एकीकडे तंत्रज्ञानाने अनेक सुविधा उपलब्ध करून दिल्या, तर दुसरीकडे त्याचा अतिरेकी वापर मानसिक आरोग्यावर परिणाम करत आहे. सततच्या स्पर्धेमुळे तरुणांमध्ये आत्मविश्वासाची कमतरता आणि नैराश्य वाढत आहे. अनेक तरुण करीअरच्या ओढीत स्वतःच्या मानसिक स्वास्थ्याकडे दुर्लक्ष करतात. संशोधनानुसार आजच्या पिढीत नैराश्य आणि चिंता याचे प्रमाण वाढले आहे. मानसिक आरोग्याच्या समस्यांकडे दुर्लक्ष केल्यास त्या गंभीर स्वरूप धारण करतात. काही वेळा आत्महत्येच्या घटना देखील घडतात. त्यामुळे तरुणांनी आपल्या मानसिक आरोग्याकडे वेळेवर लक्ष द्यावे आणि योग्य उपाययोजना कराव्यात.

'आरोग्य हीच खरी संपत्ती आहे' असे म्हटले जाते. परंतु आरोग्य म्हणजे केवळ शारिरीक स्वास्थ्य नव्हे, तर मानसिक स्वास्थ्य महत्त्वाचे आहे. मानसिक तनाव, चिंता, नैराश्य यासारख्या समस्या आज वाढताना दिसतात. त्यामुळे मानसिक आरोग्य सुध्दा खूप महत्त्वाचे आहे. मन, भावना आणि विचार यांचा समतोल साधणे, तणाव, चिंता आणि अपयशाचा सामना करण्याची क्षमता असणे हे मानसिक आरोग्याचे लक्षण आहे. मानसिकदृष्टया निरोगी व्यक्ती आत्मविश्वासाने जीवन जगते, समस्यांना सकारात्मकपणे समोरे जाते आणि इतरांशी चांगले संबंध ठेवते.

''मन निरोगी असेल तर खरे यश
आणि आनंद मिळवता येतो...''

*** मानसिक आरोग्यावर परिणाम करणारे घटक**

१) शिक्षण आणि करिअरचा तणाव :–

आजच्या युगात शिक्षण आणि करिअरमधील स्पर्धा प्रचंड वाढली आहे. चांगल्या संधी मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांना कठोर परिश्रम करावे लागतात. परीक्षेतील दडपण, चांगले गुण मिळवण्याची जबाबदारी आणि सततची तुलना यामुळे अनेक तरुण मानसिक तणावाचा सामना करतात. काही वेळा अपयश आल्यास ते स्वत:ला कमी समजतात आणि नैराश्यात जातात.

२) सोशल मीडियाचा वाढता प्रभाव :–

फेसबुक, इन्स्टाग्राम, ट्विटर आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर लोक आपले सर्वोत्तम क्षण दाखवतात. मात्र वास्तव आणि आभासी जग यात मोठी तफावत असते. इतरांच्या यशस्वी जीवनशैलीशी स्वतःची तुलना केल्यामुळे अनेक तरुण असमाधानी आणि तणावग्रस्त होतात. लाईक्स आणि फॉलोअर्सच्या स्पर्धेत मानसिक शांतता हरवते. सतत सोशल मिडियावर असल्याने तणाव, चिंता आणि नैराश्य वाढते. इतरांच्या यशाशी तुलना केल्याने न्यूनगंड निर्माण होतो. झोपेच्या तक्रारी वाढतात, कारण अनेकजण रात्री उशिरापर्यंत मोबाईल वापरतात.

सोशल मीडिया हा आधुनिक जीवनशैलीचा महत्त्वाचा भाग झाला आहे. त्याचा अतिरेक वापर टाळणे आवश्यक आहे. मर्यादित आणि सकारात्मक वापर केल्यास तो फायदेशीर ठरतो अन्यथा त्याचे मानसिक, सामाजिक आणि शारिरिक आरोग्यावर दुष्परिणाम होऊ शकतात.

३) कुटुंबातील तणाव आणि अपेक्षा :

पालकांकडून लादल्या जाणाऱ्या अपेक्षा आणि समाजाच्या दडपणामुळे अनेक तरुण मानसिक तणावाचा सामना करत असतात. काही वेळा पालक आपल्या पाल्यांच्या मनस्थितिचा विचार न करता त्यांच्यावर दबाव टाकतात. पालकांना आपल्या मुलांनी उत्तम शिक्षण घ्यावे आणि मोठे यश मिळवावे असे वाटते. परीक्षेत चांगले गुण मिळविणे, मोठ्या महाविद्यालयात प्रवेश घेणे आणि समाजात प्रतिष्ठा मिळविणे या अपेक्षा मुलांवर मानसिक दबाव टाकतात. सतत अपेक्षांचा भार पेलताना अपयश आल्यास मुलांचा आत्मविश्वास खचतो. काही मुलं हा तनाव सहन करु न शकल्याने चुकीच्या सवयी किंवा व्यसनांकडे वळू शकतात. काही जण मानसिकदृष्टया अस्वस्थ होऊन समाजापासून दूर राहतात.

४) आर्थिक अस्थिरता :–

शिक्षणाच्या खर्चामुळे किंवा स्वतंत्रपणे राहण्यासाठी आवश्यक असलेल्या पैशांमुळे आर्थिक तणाव निर्माण होतो.

अपुरी आर्थिक स्थिती हे मानसिक अस्वास्थ्याचे एक मोठे कारण आहे. शिक्षण, नोकरी आणि स्वत:च्या जबाबदाऱ्या सांभाळताना अनेक तरुण आर्थिक तणावाला समोरे जातात. चांगल्या नोकरीसाठी सतत प्रयत्न करणे, खर्च व्यवस्थापन करणे आणि भविष्याची चिंता यामुळे मानसिक आरोग्यावर परिणाम होतो. शिक्षण पूर्ण झाल्यानंतरही लगेच नोकरी मिळेलच असे नाही. चांगल्या पगाराची नोकरी मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागतो. काही तरुणांना कर्ज फेडण्याची चिंता सतावत असते, यामुळे त्यांना मानसिक अस्वस्थता जाणवते.

५) आरोग्यदायी सवयीचा अभाव :

आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत आरोग्य हा एक महत्त्वाचा विषय बनला आहे. पूर्वीच्या काळात लोक शारीरिकदृष्ट्या अधिक सक्षम आणि तंदुरुस्त होते. कारण त्यांचे जीवन नैसर्गिक आणि आरोग्यदायी सवयींनी समृद्ध होते. मात्र आधुनिक तंत्रज्ञान, जंक फूडची वाढती सवय, व्यायामाचा अभाव आणि अनियमित जीवनशैली यामुळे आरोग्यदायी सवयी मागे पडत आहेत. याचा परिणाम शारिरीक तसेच मानसिकतेवर होत आहे.

- हल्ली अनेक लोक उशिरा झोपतात आणि पुरेशी झोप घेत नाहीत.
- सकाळी व्यायाम किंवा योगा करण्याची सवय कमी झाली आहे.
- घरगुती आणि पोषणयुक्त अन्नाऐवजी लोक फास्ट फूड आणि प्रक्रिया केलेले पदार्थ जास्त खाण्यास प्राधान्य देतात.

मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी उपाय :-

१. सकारात्मक विचारसरणी :-

- नकारात्मक गोष्टीपेक्षा सकारात्मकतेवर भर देणे.
- स्वत:बद्दल चांगले विचार करणे आणि आत्मविश्वास वाढवणे.
- आपल्या यशाचे आणि चांगल्या गोष्टीचे कौतुक करणे.
- स्वत:वर विश्वास ठेवा आणि छोट्या-छोटया यशाचा आनंद घ्या.
- स्वत:वर विश्वास ठेवा आणि आयुष्यातील समस्या स्वीकारून त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न करा.

२) नियमित व्यायाम करा. :-

- शारीरिक हालचाली केल्याने मेंदूत आनंद निर्माण करणारे हार्मोन्स स्त्रवतात.
- रोज किमान ३० मिनिटे चालणे, धावणे, योगा किंवा कोणताही खेळ खेळा.
- दररोज व्यायाम केल्यानी आरोग्य चांगले होते आणि मानसिक तणाव कमी होतो.

३) संतुलित आहार घ्या :-

- योग्य आहार घेतल्याने शरीरासोबत मनही तंदुरुस्त राहते. ताजे फळे, भाज्या आणि पोषणयुक्त पदार्थ मानसिक आरोग्यासाठी उपयुक्त असतात.
- पोष्टिक आणि सकस आहार घेतल्याने मानसिक स्थिरता मिळते.
- भरपुर पाणी प्या आणि जंक फूड टाळा.
- ओमेगा - ३ युक्त पदार्थ (बदाम, अक्रोड, मासे) आणि ताज्या भाज्या फळे खा.

४. स्क्रीन टाइम कमी करा :-

- सतत सोशल मिडिया आणि टिव्ही पाहणे टाळा.
- डिजिटल डिटॉक्स करून वास्तव जीवनावर लक्ष केंद्रित करा.
- जितका वेळ आपण सोशल मिडियाच्या दूर राहू तितका वेळ आपले मानसिक आरोग्य सुध्दा चांगले राहतील
- सोशल मिडियावर किती वेळ घालवायचा हे ठरवा आणि त्याचप्रमाणे वापर करा.

निष्कर्ष :-

बदलत्या काळात मानसिक आरोग्याचा प्रश्न अधिक गंभीर होत आहे. तंत्रज्ञान, स्पर्धा, आणि बदलती जीवनशैली यामुळे तरुणांमध्ये तणाव, चिंता आणि नैराश्य वाढले आहे. मात्र योग्य जीवनशैली, सकारात्मक दृष्टिकोन, संवाद आणि आत्मभान यांच्या मदतीने मानसिक आरोग्य सुधारता येते. कुटुंब समाज आणि शिक्षण संस्थांनीही या समस्यांकडे गांभीर्याने पाहावे आणि तरुणांना मानसिक स्थैर्य मिळवण्यासाठी आधार द्यावा. मानसिक आरोग्य जपले, तरच तरुण पिढ़ी खऱ्या अर्थाने सक्षम, आनंदी आणि यशस्वी होऊ शकेल.

कुटुंब, समाज आणि शिक्षण संस्थांनीही तरुणांच्या मानसिक आरोग्याबद्दल जागरूकता निर्माण करावी. मानसिक आरोग्य उत्तम असेल, तरच तरुण पिढी भविष्याच्या दिशेने आत्मविश्वासाने वाटचाल करू शकेल. म्हणूनच ''मन निरोगी तर जीवन सुखी'' हे लक्षात ठेवुन मानसिक आरोग्य जपण्यावर भर द्या.

''तणावाला सामोरे जाणे हा संघर्ष नाही,
तर मानसिक आरोग्य जपणे ही जीवनशैली आहे''

टिना सुभाष उघडे
बी.एस.सी. भाग-२

बदलत्या काळातील तरुणांचे मानसिक आरोग्य

किशोरावस्था आणि प्रौढावस्था या आयुष्याच्या दोन स्थित्यंतराच्या मध्ये, अतिशय नाजुक, चंचल व आव्हानात्मक असा एक टप्पा असतो, तो म्हणजे तारुण्यावस्था, म्हणजेच आजकालची यंग जनरेशन.

सध्याच्या वेगाने बदलत्या काळात आणि बदललेल्या जीवनशैलीमुळे आयुष्यातील ह्या टप्प्याला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. हा काळ म्हणजे लहानपणीच्या कौशल्यांमध्ये भर घालण्याचा काळ. शारीरिक, मानसिक आणि आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र होण्याचा काळ, त्यामळे खरे तर सर्वांना हवाहवासा वाटणारा, पण या स्वातंत्र्य बरोबर येते ती जबाबदारी आणि या वयात गोंधळ हा असतो की स्वातंत्र्य हवे पण जबाबदारी नको.

या सर्वाबरोबर जीवनशैलीमधले खूप मोठे बदल देखील घडत असतात. जसे की, शाळेमधील बदल, घरापासून लांब राहणे, कॉलेजला जाणे किंवा एखादे नवीन काम चालू करणे. मोठया जगाशी संबंध वाढतो. कोणती शाखा घ्यायची, कुठे राहायचं याचे निर्णय घ्यावे लागतात. मित्र मैत्रिणीना इंप्रेस करण्याची ओढ, विरुद्ध लिंगी व्यक्तीचे आकर्षण, हे सांभाळून नवीन नाते बनवायची असतात.

बऱ्याच जणांसाठी हा खूप उत्साहाचा काळ असतो; पण याचबरोबर बऱ्याच जणांसाठी हा तणावाचा आणि काळजीने भरलेला असतो. सर्वात महत्त्वाचे ही काळजी आणि तणाव खूप वेळेला त्या व्यक्तीच्या सहनशक्ती पलीकडचा असतो. अश्यावेळेस हा तणाव लक्षात घेऊन त्याचे नियोजन होणे हे खूप महत्त्वाचे असते आणि जर हे सर्व दुर्लक्षित राहिले तर ते मानसिक आजारांना निमंत्रण देणारे ठरते.

यात भरीस भर म्हणून, इंटरनेटचा (समाज माध्यमे) वाढलेला अमर्याद वापर. नक्कीच याचे खूप फायदे आहे; पण हेच माध्यम जास्तीच्या तणावाचे कारण ठरू शकते. गावी राहणारे, सर्व मूलभूत आणि जीवनावश्यक गोष्टीचा तुटवडा याला सामोरे जाणारे अजुनही तणावपूर्ण जीवन जगत असतात. या सर्व जास्तीच्या अडचणींना सामोरे जाणारे हे मानसिक आजारांना बळी पडण्याची शक्यता असते.

अर्ध्यापेक्षा जास्त मानसिक आजार हे वयाच्या १४ वर्षाआधीच सुरू होतात. पण बऱ्याच वेळा ह्या गोष्टी लक्षात येत नाहीत. या वयामध्ये नैराश्य हा तीन नंबरचा आजार आहे, यावरून याची व्याप्ती लक्षात याती. आत्महत्या हा १५ ते २९ या वयोगटातील, मृत्यूस कारणीभूत ठरणारा दोन नंबरचा आजार आहे. याच वेळेस आपल्या सिनेसृष्टीत केलेले व्यसनांचे उद्दातीकरणामुळे मुले व्यसनांच्या आहारी जातात. यातूनच मग असुरक्षित गाडी चालवणे, असुरक्षित आचरण व वर्तन, अनियमित खाण्याच्या व झोपण्याच्या पद्धती, या चुकीच्या जीवनपद्धतीचा स्वीकार केला जातो, जो की भविष्यातील बऱ्याच नकोश्या असणाऱ्या गोष्टींना कारणीभूत ठरतो.

आतापर्यंत समाजात आहे ती मानसिक आरोग्याविषयीची अनास्था, पण चित्र बदलते आहे. (Growing recognition of the & importance of building mental resilience) समाजात मानसिक आरोग्य जपण्यासाठी आणि त्याच्या संवर्धनासाठी आजकाल बऱ्याच गोष्टी चालू आहेत. बरेच मदत करणारे हात आहेत, पण ''मला स्वतःला मानसोपचाराची गरज आहे'' हे आजच्या तरुणाला कळत नाही. कळलं तरी आत्मसात होत नाही आणि आत्मसात झाले तर कोण काय म्हणेल भीतीने उपचार घेतले जात नाही.

जेव्हा आपण आपल्या यंग जनरेशनला समजून घ्यायला सुरुवात करू तेव्हा खरी जनजागृती सुरू झाली असे मानता येईल. आपण त्यांना वेळ द्यायला पाहिजे. त्यांचं बोलणं ऐकून घ्यायला पाहिजे आणि गरज असल्यास न डगमगता मानसोपचार तज्ञाची मदत घ्यायला पाहिजे. यासाठी पालक, शिक्षक आणि मित्र मैत्रिणी हे अतिशय महत्त्वाचा रोल होतात. पालकांनी संयमाने ऐकावे, पहावे व आधार द्यावा. शिक्षकांनी मानसिक दृष्टयाही विद्यार्थ्याकडे पहावे, मदत करावी व काही शंका असल्यास वेळेत सुचवावे. मित्र मैत्रिणी हे सर्वात जवळचे नाते असते.

या यंग जनरेशनला मित्रांनी सांगितलेले पटकन पटते म्हणून आपल्या मित्र मैत्रिणी ने काही मनातल्या गोष्टी सांगितल्या किंवा ते अति चिंता करत असल्यास योग्य सल्ला द्या. मोठ्यांची मदत घ्या. महत्त्वाचं म्हणजे कोणी मानसोपचार तज्ञाकडे जात असेल तर त्याला परावृत्त करू नये. गोळया बंद करण्यास सांगू नये.

लहानपणापासून मुलांना आयुष्य जगण्याचे शिक्षण दिले पाहिजे. वर्गात पुस्तकामधील पुरेसे नाही. मुलांना कमतरतेची जाणीव असू द्या. त्यांचे लहान सहान निर्णय त्यांनाच घेऊ द्या आणि त्यातून शिकू द्या. वास्तववादी म्हणजेच शक्य साध्य निर्णय घेण्याची सवय लावा. त्यांचा आत्मविश्वास वाढवा. समस्या सोडवण्याचे, त्यांचा सामना करण्याचे कौशल्य विकसित करा.

आपल्या यंग जनरेशन ला मानसिक दृष्ट्या बलवान, सामर्थवान बनवायचे असेल तर बऱ्याच गोष्टी आपण करू शकतो आणि मग आपली तरुणाई खऱ्या अर्थाने 'मृत्युंजय' चा शिवाजी सावंतांच्या कादंबरीतल्या 'कर्णाच्या' तारूण्याच्या वर्णनाप्रमाणे जगेल.

''तारुण्य! ज्वलंत धमन्यांच अविरत स्पंदन: निसर्गानं मानवाला दिलेला सर्वात श्रेष्ठ वर! जीवनाच्या नगरातील एकमेव राजमार्ग ! निसर्गाच्या साम्राज्यातला वसंत! मनाच्या मयूराचा पूर्ण पसरलेला पिसारा! फुललेल्या शरीर भुजंगाचा डौलवार असा ठिपकेदारपणा ! भावनांच्या उद्यानातील धुंद केवढा ! विश्वकर्त्याच्या अविरत धावणाऱ्या रथातील सर्वात ऐटदार घोडा ! माणसानं मानानं मिरवायचा काळ ! काहीतरी मिळवायाचा काळ ! शक्तीचा आणि स्फूर्तीचा काळ ! काहीतरी करावं असं खऱ्या अर्थानं वाटणारा ध्येयवेडा काळ!

हे सर्व लिहिण्यामागे जनजागृती हा उद्देश आहेच पण औचित्य आहे ते जागतिक मानसिक आरोग्य दिनाचे. १० ऑक्टोबर हा १९९२ पासून जागतिक मानसिक आरोग्य दिन म्हणून जगभर पाळला जातो. या दिनाच्या निमित्ताने जगभर मानसिक आरोग्याविषयी जनजागृती केली जाते.

शर्वरी विनोद बोरले
बी.एस्सी. भाग-२

***

अवकाश संशोधनात भारताची कामगिरी

अंतराळ संशोधन म्हणजे बाह्य अवकाशाचा अभ्यास करून केलेला वैज्ञानिक अभ्यास. अवकाश तंत्रज्ञानाच्या वापरापासून ते निरीक्षण करण्यायोग्य विश्वापर्यंत विस्तृत संशोधन होत आहे.

इस्त्रोची स्थापना १९६९ साली डॉ. विक्रम साराभाई यांच्या मार्गदर्शनाखाली झाली. भारताने १९७५ मध्ये पहिला उपग्रह ''आर्यभट्ट'' प्रक्षेपित केला आणि त्यानंतर अनेक यशस्वी मोहिमा पार पाडल्या.

भारताचे महत्त्वचपूर्ण अंतराळ मोहिमांचे यश

१) चांद्रयान मोहिमा :

चांद्रयान-१ (२००८) : या मोहिमेमुळे पृष्ठभागावर पाण्याचे अंश असल्याचा शोध लागला.

चांद्रयान -२ (२०१९) : विक्रम लँडर अपयशी ठरला, पण ऑर्बिटरने महत्त्वाची माहिती दिली.

चांद्रयान-३ (२०२३) : भारताने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वी लँडिंग करणारा पहिला देश होण्याचा मान मिळवला.

२) मंगळयान (२०१३) :

भारताने पहिल्याच प्रयत्नात मंगळ ग्रहावर यशस्वीपणे पोहोचणारा पहिला देश होण्याचा इतिहास रचला.

३) गगनयान (आगामी मोहिम) :

भारतीय अंतराळवीरांना अंतराळात पाठविण्याचा हा पहिला मानयुक्त प्रकल्प आहे.

४) आदित्य-एल-१ (२०२३) :

हे मिशन सूर्याच्या अभ्यासासाठी पाठवण्यात आले आहे.

५) इनसेट आणि जीसेट उपग्रह यंत्रणा :

भारताच्या दूरसंचार हवामान अंदाज आणि प्रसारण सेवासाठी इस्त्रोने इनसेट आणि सीसेट मालिकेतील उपग्रह यशस्वीरित्या प्रक्षेपित केले आहेत.

भारताचा जागतिक स्तरावरील प्रभाव -

इस्त्रोच्या किफायतशीर आणि प्रभावी तंत्रज्ञानामुळे भारताने अनेक देशासाठी उपग्रह प्रक्षेपण करुन जागतिक स्तरावर विश्वासार्हता मिळवली आहे. पीएसएलव्ही आणि जीएसएलव्ही सारख्या प्रक्षेपक यंत्रणांमुळे भारताने अनेक व्यावसायिक उपग्रह अवकाशात पाठवले आहेत.

अंतराळातील वस्तूंचे निरीक्षण ज्याला खगोलशास्त्र म्हणून ओळखले जाते. विश्वसनीय रेकॉर्ड केलेल्या इतिहासापूर्वीचे असले तरी, विसाव्या शतकाच्या मध्यात मोठ्या आणि तुलनेने कार्यक्षम रॉकेटच्या विकासामुळे भौतिक अवकाश संशोधन प्रत्यक्षात येऊ शकले, अवकाश अन्वेषणासाठी वैज्ञानिक संशोधनात प्रगती करणे, राष्ट्रीय प्रतिष्ठा, वेगवेगळ्या राष्ट्रांना एकत्र करणे, मानवतेचे भविष्यातील अस्तित्व सुनिश्चित करणे आणि इतर देशांविरुध्द लष्करी आणि धोरणात्मक लष्करी फायदे विकसित करणे.

अंतराळ संशोधनाचा प्रारंभिक काळ सोव्हिएत युनियन आणि अमेरिका यांच्यातील अंतराळ शर्यती द्वारे चालवला गेला. शीतयुद्धाच्या काळात अवकाश संशोधन सुरु झाले. अण्वस्त्रे तयार करण्याच्या क्षमतेवर संरक्षण हल्ल्याच्या कथेने जमीन आणि हवेवर नियंत्रण ठेवण्याची शक्ती यावर लक्ष केंद्रीत केले. सोव्हिएत युनियन आणि अमेरिका दोघेही अवकाश अन्वेषणाद्वारे तंत्रज्ञानाची श्रेष्ठता सिद्ध करण्यासाठी धावत होते. खरं तर, नासाची निर्मिती स्पुतनिक ला प्रतिसाद म्हणून झाली. ४ ऑक्टोंबर १९५७ रोजी सोव्हिएत युनियन स्पुतनिक-१ या यानाचे पृथ्वीच्या कक्षेत पहिले मानवनिर्मित अवकाशयान प्रक्षेपण आणि २० जुलै १९६९ रोजी अमेरिकन अपोलो ११ महिमेद्वारे चंद्रावर पहिले उतरणे हे या सुरुवातीच्या काळातील महत्त्वाचे टप्पे मानले जातात. सोव्हिएत अवकाश कार्यक्रमाने अनेक टप्पे गाठले ज्यात १९५७ मध्ये कक्षेत पहिला सजीव प्राणी, १९६७ मध्ये पहिले मानवी अंतराळ उडाण (कोस्तीक-१ वर युरी गागरिन), १८ मार्च १९६५ रोजी स्पेसवॉक, १९६६ मध्ये दुसऱ्या खगोलीय पिंडावर पहिले

स्वयंचलित यान उतरणे आणि १९७१ मध्ये दुसऱ्या प्रक्षेपण यांचा समावेश आहे. पहिल्या २० वर्षीच्या अन्वेषणानंतर एका वेळी होणाऱ्या उडाणापासुन ते अक्षग्या हार्डवेअर जसे की स्पेस शटल प्रोग्राम आणि स्पर्धेपासून ते आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानका (आयएसएस) सारख्या सहकार्याकडे लक्ष केंद्रीत केले गेले.

मार्च २०११ मध्ये एसटीएस–१३३ नंतर चे मोठ्या प्रमाणात कार्य पूर्ण झाल्यानंतर अमेरिकेच्या अंतराळ संशोधनाच्या योजना अस्थिर राहिल्या. २०२० पर्यंत चंद्रावर परतण्याचे ठेवणारा नक्षत्र कार्यक्रम २००९ मध्ये एका तंत्र, पुनरावलोकन पनव्हेज अवावस्तव ठरवला. नक्षत्र शेवटी ऑटैमिस प्रोग्रामने बदलले गेले ज्यापैकी पहिले मिशन २०२२ मध्ये झाले. ऑटैनिस सह नियोजित लॅडिंगसह खाजगी अंतराळ कॅप्सूल आणि उपग्रह उत्पादनाच्या विकासासह तीव्रतेने सुरु झाला.

२००० च्या शतकात भारताने चंद्रयान कार्यक्रम सुरु केला. तेव्हा चीनने यशस्वी स्पेसप्लाईट प्रोग्राम सुरु तर युरोपियन युनियन आणि जपानही भविष्यातील क्रू स्पेस मोहिमांची योजना आखली आहे. २०२० च्या दशकात चीनच्या नेतृत्वाखाली आंतरराष्ट्रीय चंद्र संशोधन केंद्र आणि अमेरिकेच्या नेतृत्वाखालील ओटेमिस प्रोग्राम हे दोन प्रमुख जागतिक कार्यक्रम लोकप्रिय झाले आहेत. ज्यात चंद्र प्रवेशद्वार आणि ओटेमिस बेस कॅम्प बांधण्याची त्यांची योजना आहे. प्रत्येकाचे स्वत:चे आंतरराष्ट्रीय भागीदार आहेत.

मोनाली कुंदनराव कांबळे
बी.एस.सी. भाग–२

***

रतन टाटा यांचे समाजासाठी योगदान



रतन टाटा हे भारतातील सर्वात आदरणीय, सन्माननीय तसेच यशस्वी उद्योगपतीपैकी एक आहेत. रतन टाटा यांचा जन्म २८ डिसेंबर १९३७ रोजी मुंबई येथे झाला. त्यांचे उद्योगविश्वातील योगदान जगभरात ओळखले जाते. रतन टाटा हे भारतातील प्रसिद्ध उद्योगपती जमशेदजी टाटा यांच्या घराण्याशी संबंधीत आहेत. रतन टाटा यांचे प्रारंभिक जीवन म्हणजेच त्यांचे कुटुंब, बालपण आणि शिक्षण हे त्यांच्या जीवनातील महत्वाचे पैलू आहेत. चला सखोल आढावा घेऊया.

रतन टाटा यांचे वैयक्तिक जीवन हे त्यांच्या व्यावसायिक आणि परोपकारी योगदानासारखेच साधे आणि निस्वार्थ होते. त्यांनी नेहमीच त्यांच्या कामावर आणि समाजसेवेवर लक्ष केंद्रित केले. त्यांचे व्यक्तिगत जीवन साधेपणाने आणि गोपनीयतेने जगले आहे, त्यांची जीवनशैली नेहमीच साधी राहिली असून त्यांनी प्रसिद्धीपासून दूर राहण्याचा प्रयत्न केला आहे.

रतन टाटा यांचे शिक्षण

रतन टाटा यांचे प्रारंभिक शिक्षण कॅथेड्रल अँड जॉन कॉमन स्कूल, मुंबई येथे घेतले. शालेय शिक्षणानंतर त्यांनी अमेरिकेत जाऊन कॉर्नेल युनिव्हर्सिटी मधून आर्किटेक्चर आणि स्ट्रक्चरल इंजिनिअरिंगमध्ये पदवी प्राप्त केली. (१९६२) त्यानंतर त्यांनी हार्वर्ड बिझनेस स्कूल मधून १९७५ मध्ये ॲडव्हान्स मॅनेजमेंट प्रोग्राम पूर्ण केला.

रतन टाटा यांचे छंद आणि आवड

रतन टाटा यांना वाचनाची खूप आवड होती. ते त्यांच्या फावल्या वेळात वेगवेगळे विषय वाचायचे. त्यांना संगीत ऐकणे देखील आवडत होते. रतन टाटा यांचे प्राण्यांवर विशेषत: कुत्र्यांवर खूप प्रेम होते. टाटा समुहाच्या मुंबईतील कार्यालयात त्यांच्याबरोबर अनेक कुत्रे राहत. त्यांनी अनेक प्राण्यांना दत्तक घेतले होते.

त्यांना फोटोग्राफीची सुद्धा आवड होती. ते फावल्या वेळेत विविध स्थळांची छायाचित्रे काढायचे.

रतन टाटा यांचे वैवाहिक स्थिती

रतन टाटा यांनी कधीच लग्न केले नाही. त्यांनी एका मुलाखतीत सांगितले होते की, त्यांच्या जीवनात काही वेळा विवाह करण्याची शक्यता होती पण विविध कारणांमुळे तो योग येऊ शकला नाही. त्यांच्या मते हे निर्णय त्यांच्या जीवनाला दुसऱ्या दिशेने घेऊन गेले.

रतन टाटा यांची पहिली नोकरी

रतन टाटा यांनी शिक्षणासाठी अमेरिकेतील कॉर्नेल विद्यापीठात प्रवेश घेतला, जिथे त्यांनी आर्किटेक्चर आणी स्ट्रक्चरल इंजिनिअरिंगमध्ये पदवी मिळवली. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी तिथेच स्थायिक होण्याचा निर्णय घेतला. पण त्यांची आजी आजारी असल्यामुळे आणी त्यांना आजीच्या प्रकृतीची खूप काळजी असल्यामुळे भारतात परत यावे लागले.

भारतामध्ये परतल्या नंतर रतन टाटा यांना त्याच्या कुटुंबाच्या प्रसिद्ध टाटा समूहात थेट नोकरी मिळाली नाही. त्याऐवजी त्यांनी आय.बी.एम. मध्ये रुजू होण्याचा निर्णय घेतला. मात्र त्यांच्या या नोकरीबद्दल त्यांचे कुटुंबीय, विशेषत: टाटा परिवारातील इतर सदस्य यांना काहीच माहिती नव्हते.

रतन टाटा यांनी समाजासाठी केलेल्या योगदानाबदल माहिती खालीलप्रमाणे –

रतन टाटा हे एक भारतीय उद्योगपती आणी टाटा सन्सचे माजी अध्यक्ष होते. त्यांनी समाजकार्यासाठी अनेक उपक्रम राबवले. त्यांनी ट्रान्सफॉर्मिंग रूरल इंडिया इनिशिएटिव्ह (टी.आर.आय.) या उपक्रमाची स्थापना केली होती. या उपक्रमातून तीव्र गरिबीच्या भागात बदलासाठी, सरकार स्वयंसेवी संस्था, नागरी समाज गट आणी परोपकारी यांच्याशी सहकार्य केले जाते. त्यांनी समाजकार्यासाठी केलेल्या योगदानामुळे त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना २००० मध्ये पद्मभूषण आणी २००८ मध्ये पद्मविभूषण या पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या समाजकार्याची संपूर्ण जगाने देखील दखल घेतली आहे. त्यांना भारतरत्न देण्यात यावा अशी मागणी भारतातील जनतेतून करण्यात येत आहे.

रतन टाटा यांनी टाटा समुहाला जागतिक समूहात रूपांतरित करण्यात, भारताच्या आर्थिक विकासाला चालना देण्यात महत्वाची भूमिका बजावली. त्यांचे नेतृत्व आंतरराष्ट्रीय विस्तार, नवकल्पना, परोपकार आणी नैतिक व्यवसाय पद्धतीपर्यंत विस्तारले. ज्यामुळे कॉर्पोरेट भारत आणी समाज या दोघांवरही कायमचा प्रभाव पडला.

रतन टाटा यांचा जगभरात नावलौकिक आहे. भारतात त्यांना मानणारा तर मोठा वर्ग आहे. तसेच गेल्या काही दिवसांपासून त्यांना भारतरत्न देण्याची मागणी जोर धरू लागलीय. पण तुम्हाला माहितीय का ? रतन टाटांचे आजोबा मोठे समाज सुधारक होते. त्यांच्याकडून रतन टाटांना हा वारसा लाभलाय. सर रतन टाटांना टाटा समूहातील सामाजिक कार्यात वाहुन घेतलेले रतन टाटा म्हटले जाते. ते जमशेदजी टाटाचे छोटे पुत्र आणी नवल टाटा यांचे वडील होते. म्हणजेच सध्याचे टाटा समूहाचे चेअरमन रतन नवल टाटाचे आजोबा होते. फार कमी वयात त्यांना जग सोडावं लागले. त्यांनी लहान वयातच खूप उल्लेखनीय सामाजिक कार्य केलीत. तो वसा ते मागे सोडून गेले असून, टाटा समूह त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवत पुढे जातोय. टाटा समूह उभे करण्यातील चार मोठ्या लोकांमधील ते एक आहेत. तीन इतर लोक म्हणजे. जमशेदजी टाटा, दोराबजी टाटा आणी रतनजी दादाभाई टाटा आहेत. सर रतन टाटा हे रतनजी या नावानं लोकप्रिय होते. रतनजी टाटा दुसऱ्यांना मदत करण्यात नेहमीच पुढे असायचे तसेच भारतातील गरिबी दूर व्हावी यासाठी प्रयत्न करणाऱ्या लोकांमधील एक होते. त्यांना स्वत:च मूल नव्हतं. रतनजी टाटा यांच्या निधनांतर त्यांची पत्नी नवजबाई टाटा यांनी कुटुंबातीलच एक अनाथ मुलगा दत्तक घेतला. टाटा समूहाचे सध्याचे चेअरमन रतनटाटा हे सुध्दा टाटा यांचे पुत्र आहेत.

रतनजी यांची बॉम्बे सेंट जेव्हियर्स कॉलेजमधून शिक्षणाचे धडे गिरवले होते. ते त्यांचे मोठे भाऊ दोराबजी टाटा यांच्यापेक्षा १२ वर्षांनी लहान होते. त्यांनी १८९६ मध्ये टाटा अँड सन्समध्ये एक काम पाहण्यास सुरूवात केली. वर्ष १९०४ मध्ये वडिलांच्या निधनानंतर त्यांनी फ्रान्सची कंपनी युनियन फायर इन्शुरन्स कंपनीत व्यवसाय पाहणे सुरु केले. ज्याची भारतात टाटा ॲंड सन्स एजंट आहे. त्यांच्याकडे ट्रेडिंग फर्म टाटा ॲंड कंपनीचा पदभार आला. ती कंपनी कापूस, रेशम, मोती, तांदूळ आदी व्यवसाय करत होती. त्याच्याच कार्यकाळात मुंबईत १९१५ मध्ये एक मोठा वीज प्रकल्प सुरू झाला.

त्यांच्या कार्यकाळात १९१२ साली टाटा आयर्न ॲंड स्टील कंपनीचा कार्यभार सुरू झाला. तसेच मुंबईत १९१५ मध्ये एक मोठा वीज प्रकल्प सुरू करण्यात आला. त्यातून मुंबईतल्या उद्योगांना सवलतीमध्ये वीज उपलब्ध झाली. त्यांनी सामाजिक कार्यात वाहून घेत एका ट्रस्ट फंडाची स्थापना केली.

गांधीजींनाही केली मदत

त्यांना सामाजिक कार्य करायला आणी दुसऱ्याला मदत करण्यात खूप आवडायचे. दक्षिण आफ्रिकेत वर्णव्देषविरोधी आंदोलनात त्यांनी गांधीजींना नैतिक आणी आर्थिक मदत केली. त्या वेळी त्यांनी ११ लाख रुपयांचे दान दिले. ते स्वातंत्र्यसैनिक गोपाळ गोखले यांचे मित्र होते. त्यांनी गोखलेंच्या सामाजिक कार्यसाठी १० वर्षापर्यंत १० हजारांची मदत दिली.

भारतातल्या गरिबीवर केला अभ्यास.

त्यांनी लंडन स्कूल ऑफ इकोनॉमिक्समध्ये गरिबी या विषयावर अध्ययन करण्यासाठी एका संस्थेची स्थापना करून तिला वार्षिक ४०० पौंडांची मदत दिली. आता ती संस्था सर रतन टाटा फाऊंडेशनच्या स्वरूपात स्थापित आहे. वर्ष १९१२ मध्ये सर रतन यांच्या मदतीने एलएसईमध्ये समाज अध्ययन विभागाची स्थापना झाली.

पाटलीपुत्रमध्ये खोदकामासाठी दिली मदत

त्यांनी १९१३ ते १९१७ मध्ये बिहारमधील पटण्यातील पाटलीपुत्र येथे पुरातत्व अवशेष शोधून काढण्यासाठी फंडिंग केले. या खोदकामात १०० स्तंभाचा सम्राटाचा मौर्यकालीन दरबार मिळाला. त्यांनी १९०५ मध्ये म्हैसूरला इंडियन इन्सिट्यूट ऑफ सायंटिफिक अँड मेडिकल रिचर्सची स्थापना केली. त्यांची समाजसेवा पाहून ब्रिटिश सरकारनं १९१६ मध्ये त्यांनी माईटहुट म्हणजे सर ही उपाधी बहाल केली. रतनजी ४७ वर्षांचे असतानाच त्यांनी रतन टाटा यांना भारतीय उद्योगाचे जनक देखील म्हटले जाते. त्यांनी आपल्या व्यक्तिमत्वाने लोकांना प्रभावित केले. रतन टाटा यांनी या जगाला अनेक मौल्यवान भेटवस्तू दिल्या. त्यांचे योगदान आज भारतासह संपूर्ण जगासाठी एक उदाहरण आहे. राष्ट्र उभारणीत रतन टाटा यांचे अगणित योगदान आहे जे विसरता येणार नाही. पण त्यांच्यापैकी काही योगदान असे आहे ज्यांनी काळाच्या क्षितिजावर छाप सोडली आहे. ज्या वेळी संपुर्ण जग कोरोनासारख्या महामारीशी झुंजत होता त्याचवेळी भारतही आरोग्याच्या संकटाशी लढत होता. या संकटाच्या काळात रतन टाटा पुढे आले आणी त्यांनी देशाला ५०० कोटी रुपयांची मदत दिली.

कोविड-१९ हे आपल्या पुढील सर्वात कठीण आव्हानांपैकी एक होते. टाटा ट्रस्ट आणी टाटा समूहाच्या कंपन्या भूतकाळातही देशाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी पुढे आल्या आहेत. या वेळेची गरज इतर वेळेपेक्षा जास्त आहे. रतन टाटा त्यांच्या सौम्य स्वभावासाठी आणि उदार हृदयासाठी ओळखले जात होते. त्यांना श्वानाची खूप आवड होती. काही दिवसापूर्वीच त्यांनी श्वानांसाठी रुग्णालय उघडले. रुग्णालयाचे उद्घाटन करताना ते म्हणाले होते की मी माझ्या आयुष्यात अनेक पाळीव प्राणी पाळले आहेत. यामुळे मला हॉस्पिटलचे महत्व कळते. त्यांनी नवी मुंबईत बांधलेले रुग्णालय पाच मजली असून त्यामध्ये एकाच वेळी २०० पाळीव प्राण्यांवर उपचार करता येतात. हे रुग्णालय १६५ कोटी रुपये खर्चून बांधण्यात आले आहे. रतन टाटा यांचे पाळीव प्राण्यांबद्दलचे प्रेम यावरूनही समजू शकते की, ते एकदा श्वानाला मिनेसोटा विद्यापीठात घेऊन गेले होते. जिथे श्वानांची जॉइंट रिप्लेसमेंट करण्यात आली.

टाटा समूह पूर्वी फक्त मोठ्या वाहनांच्या निर्मितीसाठी ओळखला जात होता. पण १९९८ मध्ये रतन टाटा यांनी छोट्या वाहनांच्या जगातही प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आणि त्यांनी टाटा इंडिका बाजारात आणली. टाटा इंडिका ही पूर्णपणे स्वदेशी कार होती. यांचे विक्रीचे सर्व रेकॉर्ड मोडून बाजारात नवा विक्रम प्रस्थापित केला. सुमारे एक दशकांनंतर टाटांनी आणखी एक प्रयोग केला आणी २००८ मध्ये त्यांनी नैनो कार बाजारात आणली. त्याची किंमत १ लाख रुपयांपेक्षा कमी होती.

सेजल ज्ञानेश्वरराव पाल
बी.एस.सी. भाग-२

***

क्रीडा क्षेत्र करियर होऊ शकते का?

क्रीडा क्षेत्र हे केवळ खेळाडूंना आनंद मिळवून देणारे माध्यम राहिले नसून ते आता करियरच्या दृष्टीने एक महत्त्वाचा पर्याय बनला आहे. पूर्वी क्रीडा क्षेत्राकडे केवळ छंद म्हणून पाहिले जात असे, मात्र आज त्याला एक गंभीर व्यावसायिक संधी म्हणून स्विकारले जात आहे. आधुनिक जगात खेळांचे व्यावसायीकरण मोठ्या प्रमाणावर झाले असून, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळाडूंना प्रचंड प्रसिद्धी आणि आर्थिक स्थैर्य मिळत आहे. अनेक युवा खेळाडू आज केवळ आपल्या खेळाच्या जोरावर आपले करियर घडवत आहे. त्यामुळे क्रीडा क्षेत्र हे स्थिर, प्रतिष्ठित आणि भरपूर संधी असलेले करियर म्हणून उदयास आले आहे.

क्रीडा क्षेत्रात करियर करण्यासाठी सर्वप्रथम खेळाडू म्हणून स्वत:ला सिध्द करावे लागते. क्रिकेट, कबड्डी, हॉकी, ॲथलेटीक्स आणि टेबल टेनिस यासारख्या विविध खेळांमध्ये आज भारतीय खेळाडू जागतिक स्तरावर चमकत आहेत. सचिन तेंडुलकर, विराट कोहली, नीरज चोप्रा, पी.व्ही. सिंधू, मेरी कोम आणि सुनील छेत्री यासारख्या खेळाडूंनी आपल्या खेळाने भारताला अभिमान वाटावा असे प्रदर्शन केले आहे. त्यांच्या जिद्दीमुळे अनेक नव्या पीढीतील खेळाडूंना प्रेरणा मिळाली आहे. खेळाडू म्हणून करिअर करण्यासाठी अत्यंत कठोर मेहनत, सातत्यपूर्ण सराव आणि योग्य मार्गदर्शन आवश्यक असते. देशभरात विविध क्रीडा अकादमी आणि प्रशिक्षण केंद्र उपलब्ध आहेत, जिथे खेळाडूंना तांत्रिक आणि मानसिक दृष्टिकोनातून तयार करण्यात येते.

खेळाडू म्हणून यश मिळाल्यानंतर त्या खेळातील तांत्रिक आणि व्यावसायिक कौशल्यांचा वापर करुन यशस्वी प्रशिक्षक म्हणून मोठे करिअर घडवता येते. प्रत्येक यशस्वी खेळामागे एका उत्तम प्रशिक्षकाचा हात असतो. प्रशिक्षक हा केवळ खेळाडूंना तांत्रिक कौशल्य शिकवत नाही, तर त्यांच्या मानसिक आणि शारीरिक तयारीवरही भर देतो. आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षकांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. राष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षकांसाठी सकारात्मक विविध योजना आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. खेळाडू म्हणून जरी फार मोठे यश मिळत नाही, तरी प्रशिक्षक म्हणून करियर घडवता येऊ शकते.

क्रीडा क्षेत्रातील आणखी एक मोठी संधी म्हणजे क्रिडा व्यवस्थापन. आजच्या घडीला कोणत्याही खेळाचे आयोजन मोठ्या प्रमाणावर केले जाते. यासाठी उत्तम व्यवस्थापन कौशल्य असलेल्या व्यक्तींची गरज असते. क्रीडा व्यवस्थापन, प्रायोजक, मिडीया व्यवस्थापन आणि डिजीटल प्रसारण अशा अनेक जबाबदाऱ्या असतात. सध्या भारतात क्रीडा व्यवस्थापनाचे स्वतंत्र अभ्यासक्रम आणि पदवी प्रदान करणारे महाविद्यालये उपलब्ध आहेत. खेळाच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे ही एक अतिशय चांगली व्यवसायिक संधी ठरु शकते.

क्रीडा पत्रकारिता आणि समालोचन हे देखील खेळाशी संबंधित करियरचे महत्त्वाचे घटक आहेत. आज प्रत्येक मोठ्या स्पर्धेत थेट प्रक्षेपण टेलिव्हीजन, रेडीओ आणि डिजीटल माध्यमांवर केले जाते. त्यासाठी कुशल क्रीडा पत्रकार आणि समालोचक खेळाचे सखोल विश्लेषण करुन प्रेक्षकांना अधिक चांगल्या प्रकारे माहिती देतात. भारतात क्रिकेट समालोचन करणारे हर्षा भोगले, सुनील गावस्कर, संजय मांजरेकर यासारखे तज्ञ व लोकप्रिय समालोचक आहेत. याशिवाय वृत्तपत्रे, मासिके आणि ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर क्रीडा पत्रकारांसाठी मोठ्या संधी आहेत.

भारत सरकारने क्रीडा क्षेत्राच्या वाढीसाठी अनेक योजना आणि धोरणे आखली आहेत. 'खेलो इंडिया' ही योजना तरुण खेळाडूंना प्रोत्साहन देणारी एक महत्वाची योजना आहे. यामध्ये खेळाडूंना आर्थिक मदत, प्रशिक्षण सुविधा आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे मार्गदर्शन दिले जाते. तसेच 'टार्गेट' ऑलिम्पिक पोडियम स्कीम (टॉप्स) द्वारे ऑलिम्पिकमध्ये भारताचे प्रदर्शन सुधारण्यासाठी विशेष पुरस्कार आणि अनुदानेही दिली जातात जसे की अर्जुन पुरस्कार, ध्यानचंद पुरस्कार आणि राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार.

क्रीडा क्षेत्रातील करिअर केवळ आर्थिक स्थैर्य आणि प्रसिद्धीच देत नाहीत, तर ते एक निरोगी जिवनशैलीही प्रदान करते. खेळामुळे मानसिक आरोग्य सुधारते, आत्मविश्वास वाढतो आणि संकटांचा सामना करण्याची क्षमता विकसित होते. खेळ हे केवळ शरिरासाठी नव्हे, तर मनासाठी सुध्दा आवश्यक आहेत. त्यामुळेच क्रीडा क्षेत्रात करियर करणे केवळ एक व्यवसायिक नियंत्रण नसून तो संपूर्ण जिवनशैली बदलण्यासाठी मार्ग ठरु शकतो.

आजच्या डिजिटल युगात क्रीडाला क्षेत्रासोबत तंत्रज्ञानाची जोड दिल्यास करियरच्या संधी अधिक वाढतात. उदाहरणार्थ क्रीडा विश्लेषक, डेटा सायंटिस्ट, फिटनेस ट्रेनर आणि स्पोर्ट्स, फिजीओथेरपिस्ट यांचीही गरज असते. त्यामुळे क्रीडा क्षेत्र वेगवेगळ्या शाखांमध्येही करिअरच्या अनेक संधी उपलब्ध आहेत.

खेळाच्या वाढत्या व्यावसायिकीकरणामुळे क्रीडा उद्योगात मोठ्या प्रमाणावर आर्थिक उलाढाल होत आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धा जिंकणाऱ्या खेळाडूंना मोठ्यामोठ्या कंपन्याकडून जाहिरातीसाठी निमंत्रित केले जाते. खेळाडू हे आता ब्रँड ॲम्बेसेडर बनत असून त्यामुळे माध्यमातून अनेकांनी स्वतःची व्यावसायिक ओळख तयार केली आहे. त्यामुळे जर योग्य प्रशिक्षण आणि संधी मिळाली तर क्रीडा क्षेत्र हे उत्तम करियरचे साधन ठरु शकते.

शेवटी क्रीडा हे केवळ व्यावसायिक संधीसाठी नव्हे तर सामाजिक दृष्टीनेही महत्वाचे आहे. खेळामुळे सामाजिक ऐक्य निर्माण होते, राष्ट्रीय अस्मिता वाढते आणि आरोग्य सुधारते. त्यामुळेच आजच्या तरुणांनी केवळ पारंपारिक नोकऱ्यांकडेच पाहण्याऐवजी क्रीडा क्षेत्रातील करिअरच्या संधीचाही गांभीर्याने विचार करायला पाहिजे. योग्य दिशा, कठोर परिश्रम आणि समर्पण असल्यास क्रीडा क्षेत्र हे निश्चितच एक उज्ज्वल आणि यशस्वी करियर ठरु शकते.

धनश्री राजेश दरवळकर
बी.एस्सी. भाग–२

***

कृत्रिम बुद्धिमत्ता : भविष्य आणि वर्तमान

आजच्या तंत्रज्ञानाच्या युगात कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence - AI) ही विज्ञान – तंत्रज्ञानातील एक महत्त्वपूर्ण क्रांती ठरली आहे. माणसाच्या बुद्धिमत्तेचे अनुकरण करणारी ही प्रणाली आता आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहे. पुर्वी ज्या गोष्टी अशक्य वाटत होत्या, त्या आता कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने सहज शक्य होत आहेत. एआय चे महत्त्व आजच्या काळात वाढत आहे आणि भविष्यात ते आणखी वाढेल. आर्टिफिशियल इंटेलिजन्स हा शब्द नसून अत्यंत वेगाने बदलणाऱ्या जगातील एक अत्यंत बलवान असा बदल आहे. म्हणजेच सुरुवातीच्या आणि अलीकडच्या काळामध्ये जी म्हणून काही प्रगती आपल्याला दिसते. तो ठोस बदल म्हणजे आर्टिफिशिअल इंटेलिजन्स होय.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वर्तमानकाळातील प्रभाव :

आज एआय वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये वापरल्या जात आहे. तिचा प्रभाव खालील क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येतो.

आरोग्य सेवा :

कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे वैद्यकीय क्षेत्रात मोठी क्रांती झाली आहे. एआय च्या मदतीने रोगांचे निदान लवकर करता येते. अनेक रोबोटिक शस्त्रक्रिया आता अधिक अचूक आणि जलद होत आहेत. एआय आधारित चॅटबॉट्स आणि वर्च्युअल असिस्टंट्स रुग्णांना सल्ला देण्याचे कार्य करत आहेत.

शिक्षण :

एआय च्या मदतीने ऑनलाईन शिक्षण प्रणाली अधिक प्रभावी झाली आहे. वैयक्तिक शिक्षण देण्यासाठी एआय चा वापर केला जातो. एआय आधारित स्मार्ट क्लासरुम, व्हर्च्युअल प्युटर आणि भाषा अनुवादक विद्यार्थ्यांना मदत करतात.

वाहतुक आणि स्वयंचलित यंत्रणा :

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने स्वयंचलित गाड्या आता प्रत्यक्षात येत आहेत. वाहतूक व्यवस्थापनासाठी एआय चा वापर केला जातो. त्यामुळे वाहतुकीच्या समस्या आणि अपघात कमी होण्याची शक्यता आहे.

वित्तीय सेवा :

बँकिग आणि आर्थिक व्यवहारांमध्ये एआय आधारित अग्लोरिदम मोठ्या प्रमाणावर वापरले जात आहे. फॉड डिटेक्शन आणि गुंतवणुकीचे व्यवस्थापन एआय मुळे अधिक प्रभावी झाले आहे.

मनोरंजन आणि सोशल मीडिया :

नेटफ्लिक्स, युट्युब आणि स्पोटीफाय यासारखे एआय आधारित प्लॅटफॉर्म युजरच्या पसंतीनुसार कन्टेन्टची शिफारस करतात. सोशल मिडीयावर एआय चा वापर फेस स्कॅनींग, ट्रेंड ओळखणे आणि स्पॅम फिल्टरींग साठी केला जातो.

उद्योग आणि व्यवसाय :

बरेच उद्योग स्वयंचलित झाले आहेत. उत्पादन व्यवस्थापन, डेटा विश्लेषण आणि ग्राहक सेवा यामध्ये एआय चा मोठा प्रमाणात वापर होतो. चॅटबॉट्स आणि व्हर्च्युअल असिस्टंटस ग्राहकांना २४ तास सेवा देतात.

भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता कशी असेल ?

कृत्रिम बुद्धिमत्ता भविष्यात आणखी प्रगत आणि हुशार होणार आहे. खालील काही क्षेत्रांत त्याचा मोठा प्रभाव पडू शकतो.

पुर्णत: स्वयंचलित वाहने :

आज स्वंयचलित वाहने विकसित होत आहेत, पण भविष्यात पुर्णपणे एआय चलित वाहने रस्त्यावर दिसतील.

सुपरइंटेलिजन्स : भविष्यात एआय मानवी बुद्धिमत्तेपेक्षा अधिक प्रगत होईल आणि स्वत: निर्णय घेऊ लागेल. यामुळे काही धोके संभवतात, म्हणून त्याचे नियंत्रण करणे आवश्यक आहे.

वैयक्तिक एआय सहाय्यक : आजच्या ॲलक्स, सीरी आणि गुगल असिटंट पेक्षा अधिक हुशार एआय सहाय्यक भविष्यात येतील जे मानवी भावना समजू शकतील आणि अधिक वैयक्तिक मदत करु शकतील.

वैद्यकीय क्षेत्रातील क्रांती : भविष्यात एआय च्या मदतीने आणखी वेगवान आणि अचूक निदान करता येईल. काही गंभीर आजारांचे औषध तयार करण्यासाठी एआय मदत करु शकेल.

आर्टिफिशीअल इंटेलिजन्स ही टेक्नॉलाजी मानवनिर्मित आहे. मानवाने तयार केलेल्या कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करुन आपण एखाद्या मशिनरीला विचार करण्याची क्षमता देऊ शकतो, असा याचा थोडक्यात अर्थ मानायला हरकत नाही.

जॉन मॅककार्थी यांनी १९५६ साली अर्टिफिशियल इंटेलिजन्सचा शोध लावला होता. तसेच कालंतराने ह्या तंत्रज्ञानाला खूप मागणी वाढू लागली. या तंत्रज्ञानाचा वर्तमान काळामध्ये वापर केला जात आहे. भविष्यामध्ये तर आर्टिफिशिअल इंटेलिजन्स प्रत्यके मनुष्याच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनू शकतो. आर्टिफिशिअल इंटेलिजन्स वापर रिटेल, शॉपींग, फॅशन, सिक्युरिटी, सर्व्हेसेस, स्पोर्ट्स एनलिसिस, मॅन्युफॅक्चरिंग व प्रॉडक्शन अशा जवळपास सर्वच क्षेत्रात होऊ लागला आहे. वर्तमान काळात बरीचशी अशी क्षेत्र आहेत ज्यामध्ये एआयचा वापर केला जातो.

टेस्ला ही कार बनविणारी जगातील आघाडीची कंपनी. ती एआय चा वापर करुन ड्रायव्हरलेस कार बनवण्याच्या तयारीत आहे. यामधील सेन्सर्स प्रत्येक मीली सेकंदात हजारो डेटा पॉइंट कॅप्चर करते. कारचा वेग, रस्त्यांची स्थिती, ट्रॅफिक बद्दलची माहिती या आधारे इच्छित स्थळी पोहोचणार आहे. सध्या अनेक मोठ्या आणि लोकप्रिय कंपन्या एआय च्या तंत्रज्ञानाचा उपयोग करत आहे. या तंत्रज्ञानाचा उपयोग त्यांच्या फायद्यासाठी करुन ते त्यांची कंपनी मजबूत बनवत आहेत.

येणाऱ्या काही वर्षामध्ये अब्जावधी तरुण नोकऱ्या शोधण्यासाठी सज्ज होणार आहेत. या तरुणांना त्यांच्या शिक्षणाच्या योग्यतेच्या नोकऱ्या पुरवणे हे जगभरातील नेत्यांसमोरील मोठे आव्हान असेल.

त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेचा क्षेत्रात करिअरच्या असंख्य संधी उपलब्ध होतील. त्यामुळेच शालेय जीवनात एआय विद्यार्थ्यांना माहिती होणे, ही मुले या विषयांत पारंगत होणे गरजेचे आहे. सध्याच्या अभ्यासक्रमात तरी या विषयावर दुसरा काही पर्याय तर नाही.

कोरोनामुळे देशात आणि परदेशात करिअर च्या नवनवीन संधी निर्माण होत आहेत. आता बऱ्याच गोष्टी एआय संबंधीत नोकऱ्यावर अवलंबून आहेत. जर तुम्ही आयटी क्षेत्रातील नवीन क्षेत्रात करिअरचा मार्ग शोधत असाल, तर तुम्ही एआय कडे वळून भविष्य उज्वल करु शकता. भविष्यात या क्षेत्रात प्रचंड क्षमता आहे. तसेच या क्षेत्रात अनेक रोजगारांच्या उत्तम संधी आहेत. जर तुम्ही भरघोस पगाराची नोकरी करु इच्छित असाल तर एआय च्या क्षेत्रात पारंगत व्हायलाच हवे.

कृत्रिम बुद्धिमत्तेचे फायदे आणि तोटे :–

फायदे : वेग आणि अचूकता : एआय मुळे कामे अधिक वेगाने आणि अचूकतेने होतात.
मानवी चुका कमी होतात : संगणकीय अल्गोरीदममुळे चुका कमी होतात.
स्वयंचलित : एआय मुळे अनेक कामे स्वयंचलित होऊन वेग आणि श्रम वाचतात.
आरोग्य क्षेत्रात मदत : रोबोटिक शस्त्रक्रिया आणि अचूक निदानामुळे आरोग्य सेवेत सुधारणा करता येत आहेत.
नवीन संधी : एआय मुळे नवीन व्यवसाय आणि नोकऱ्यांच्या संधी निर्माण होतात.

तोटे :
नोकऱ्यांचा धोका : एआय मुळे अनेक नोकऱ्या नष्ट होण्याची शक्यता वाढत आहे.
गोपनीयतेचा भंग : एआय डेटा गोळा करुन गोपनीयतेचा भंग करु शकते.
नैतिक प्रश्न : एआय किती स्वायत्त असावे आणि त्याचा वापर कसा करावा, यावर अनेक प्रश्न निर्माण होतात.
हॅंकिगचा धोका : एआय सिस्टम हॅक केली गेल्यास मोठा धोका निर्माण होऊ शकतो.

उपसंहार :

कृत्रिम बुद्धिमत्ता ही एक आशिर्वाद आणि एक आव्हान दोन्ही आहे. जर ती योग्य प्रकारे वापरली गेली, तर ती मानवी जीवन अधिक सुकर करु शकते. मात्र, जर तिचा गैरवापर झाला, तर भविष्यात गंभीर परिणाम दिसून येऊ शकतात. म्हणूनच एआय च्या विकासासाठी जबाबदारीने आणि नैतिकतेने विचार करणे गरजेचे आहे.

कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आपल्या भविष्यात समोर जाऊन आपले सर्व निर्णय होत नसेल, पण ते आपल्या जीवनाचा मोठा भाग असेल. योग्य नियोजन आणि तंत्रज्ञानाचा सकारात्मक उपयोग केल्यास कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे मानवी जीवन अधिक प्रगत आणि सुखकर होऊ शकते.

निष्कर्ष :

भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता अधिक प्रगत होईल आणि मानवाच्या जीवनशैलीत मोठे परिवर्तन घडवेल. मात्र त्याचा जबाबदारीने आणि नैतिकतेच्या चोकटीत राहून उपयोग करणे गरजेचे आहे. एआय मानवाचा सहायक आहे. त्याचा पर्याय नाही. त्यामुळे मानवी मूल्ये जपत, योग्य मर्यादांमध्ये याचा वापर केला गेला तर भविष्य निश्चितच उज्वल ठरेल.

कृत्रिम बुद्धिमत्ता आपल्याला कशी मदत करणार आहे, हे आपल्या हातात आहे. ती मानवी प्रगतीसाठी उपयोगी पडेल का, की संकट निर्माण करेल हे आपण ठरवायचे आहे. तंत्रज्ञान चांगले किंवा वाईट नसते, ते कसे वापरले जाते यावर त्याचा परिणाम ठरतो.

फाल्गुनी चंद्रशेखर रोडे
बी.एस्सी. भाग–२



रतन टाटा यांचे समाजासाठी योगदान



रतन टाटा हे भारतातील सर्वात प्रतिष्ठित आणि आदरणीय उद्योजकांपैकी एक आहेत. टाटा समूहाचे माजी अध्यक्ष असलेल्या रतन टाटांनी केवळ उद्योगविश्वातच नव्हे, तर समाजसेवेच्या क्षेत्रातही भरीव योगदान दिले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली, टाटा समूहाने सामाजिक विकास, शिक्षण, आरोग्य– सेवा आणि गरिबांसाठी विविध उपक्रम हाती घेतले. त्यांच्या दातृत्वामुळे आणि समाजसेवेतील योगदानामुळे ते केवळ एक यशस्वी उद्योजक नाहीत, तर समाजहितासाठी कार्य करणारे आदर्श नेते ठरले आहेत.

उद्योग आणि रोजगारनिर्मिती :–

रतन टाटांनी भारतीय उद्योगाला जागतिक स्तरावर पोहोचवण्याचे कार्य केले आहे. त्यांनी टाटा मोटर्स, टाटा स्टील, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (TCS) आणि टाटा केमिकल्स यासारख्या कंपन्यांना नव्या उंचीवर नेले. त्यांनी जगातील प्रसिद्ध मोटार कंपनी 'जग्वार लँड रोव्हर' आणि 'कोरस स्टील' कंपन्यांचे अधिग्रहण करून भारताला जागतिक उद्योग क्षेत्रात प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांच्या उद्योगधंद्यांमुळे लाखो लोकांना रोजगार मिळाला आणि भारतीय अर्थव्यवस्थेला चालना मिळाली.

सामाजिक कार्य आणि शिक्षण :

रतन टाटांनी शिक्षण क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे. टाटा ट्रस्ट आणि टाटा ग्रुपच्या विविध उपक्रमांव्दारे देशभरातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन उच्च शिक्षणाची संधी दिली जाते. त्यांनी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (IISC), टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्च (TIFR) आणि नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ॲडव्हान्स्ड स्टडीज (NI-S) यांच्यासारख्या शिक्षणसंस्थांना आर्थिक मदत केली आहे.

याशिवाय हार्वर्ड बिझनेस स्कूल, कॉर्नेल युनिव्हर्सिटी आणि इतर आंतरराष्ट्रीय शिक्षणसंस्थांसाठी देखील त्यांनी मोठ्या प्रमाणावर दान दिले आहे. हे योगदान जागतिक स्तरावर शिक्षणाच्या प्रगतीसाठी मोलाचे ठरले आहे.

आरोग्य सेवा आणि सामाजिक कल्याण :

रतन टाटांनी आरोग्यसेवा सुधारण्यासाठी अनेक महत्वपूर्ण प्रकल्प हाती घेतले. टाटा मेमोरियल हॉस्पिटल हे कर्करोग संशोधन आणि उपचारासाठी भारतातील अग्रगण्य रुग्णालय आहे. त्यांनी ग्रामीण भागातील आरोग्य सुधारण्यासाठी विविध आरोग्य केंद्र आणि रुग्णालये स्थापन केली आहेत.

कोविड–१९ महामारीच्या काळात टाटा समूहाने, मोठ्या प्रमाणावर आर्थिक मदत केली. त्यांनी वैद्यकीय उपकरणे, आक्सिजन पुरवठा, रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यासाठी कोट्यवधी रुपये दान केले.

स्वस्त आणि टिकाऊ तंत्रज्ञान :

रतन टाटांच्या नेतृत्वाखाली टाटा समूहाने सर्वसामान्य लोकांसाठी स्वस्त आणि टिकाऊ तंत्रज्ञान विकसित केले

टाटा नैनो ही गाडी सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी परवडणारी कार म्हणून ओळखली जाते:

याशिवाय, ग्रामीण भारतातील लोकांना शुद्ध पाणी मिळावे यासाठी टाटांनी स्वच्छ जलशुद्धीकरण तंत्रज्ञान विकसित केले. यामुळे लाखो लोकांना शुद्ध पाणी मिळू लागले.

पर्यावरण आणि शाश्वत विकास :

रतन टाटांना पर्यावरण संरक्षणाची जाणीव होती. त्यांनी उद्योगधंद्यांमध्ये हरित ऊर्जा, सौरऊर्जा आणि पवनऊर्जेचा अवलंब केला आहे. त्यांनी टाटा क्लीन एनर्जी प्रकल्प सुरू करून भारतात नवीकरणीय ऊर्जेचा वापर वाढवण्यास मदत केली आहे. याशिवाय जंगल संवर्धन, पाणी व्यवस्थापन आणि जैवविविधता संरक्षणासाठीही त्यांनी मोठे योगदान दिले आहे.

आपत्ती व्यवस्थापन आणि मदतकार्य :

रतन टाटांनी अनेक वेळा नैसर्गिक आपत्तीग्रस्त भागांमध्ये मदतकार्य केले आहे. २००८ मधील मुंबईतील २६/११ दहशतवादी हल्ल्याच्या वेळी त्यांनी ताज हॉटेलमधील सर्व कर्मचाऱ्यांना आणि त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत दिली. याशिवाय २००१ मधील गुजरात भूकंप, २००४ चा त्सुनामी आणि २०१३ मधील उत्तराखंड पूरग्रस्तांना मोठ्याप्रमाणावर मदत केली.

टाटा समूहाची सामाजिक जबाबदारी (CSR) **धोरणे :**

रतन टाटांनी corporate Social Respon sibility (CSR) म्हणजेच कॉपोरेट सामाजिक जबाबदारीला प्रचंड महत्त्व दिले आहे. टाटा समूहाच्या कंपन्या त्यांचा नफा केवळ भागधारकांसाठी राखून ठेवत नाहीत, तर समाजाच्या भल्यासाठी मोठ्या प्रमाणावर गुंतवतात.

आरोग्य आणि पोषण :

टाटांनी टाटा ट्रस्ट च्या माध्यमांतून कुपोषण हटवण्यासाठी विविध उपक्रम राबवले.
अन्नधान्य व पोषणपूरक कार्यक्रम सुरू केले.

पाणी आणि स्वच्छता :

'मिशन स्वच्छ जल' अंतर्गत ग्रामीण भागात स्वच्छ आणि सुरक्षित पाणी पुरवठा केला. गावांमध्ये स्वच्छतागृह बांधली आणि महिलांसाठी सॅनिटरी नॅपकिन्स उपलब्ध करण्यासाठी उपक्रम राबवले.

कौशल्य विकास आणि रोजगार :

'टाटा STRIV' उपक्रमाअंतर्गत युवकांसाठी व्यावसायिक कौशल्य प्रशिक्षण दिले जाते. युवकांना तंत्रज्ञान, संगणक, आणि डिजिटल शिक्षण यामध्ये प्रशिक्षण दिले जाते.

टाटा समूहाची आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा :

रतन टाटांच्या नेतृत्वामुळे टाटा समूह हा जागतिक बँड बनला आहे. आज टाटा समूहाच्या कंपन्या १०० हून अधिक देशांमध्ये कार्यरत आहेत. त्यांनी भारतीय उद्योगाला आंतरराष्ट्रीय दर्जा मिळवून दिला. टाटा समूहाचे नावलौकिक फोर्ब्स आणि फॉर्च्यून ५०० कंपन्यांमध्ये आहे.
त्यांचे ''एथिकल बिझनेस'' मॉडेल म्हणजेच नैतिक व्यवसाय धोरण जागतिक स्तरावर प्रसिद्ध आहे.

तंत्रज्ञान आणि स्टार्टअपसाठी योगदान :

रतन टाटांनी भारतातील स्टार्टअप संस्कृतीला चालना दिली आहे. Ola, Paytm, Snapdeal, cure, fit, urban, leddar यासारख्या स्टार्टअपमध्ये त्यांनी गुंतवणुक केली आहे. त्यांनी नवीन तंत्रज्ञानावर भर देणाऱ्या AI, Robotics, Electric Vehicles यासारख्या क्षेत्रांना आर्थिक मदत केली आहे.

रतन टाटा यांचे साधेपण आणि नेतृत्वशैली :

रतन टाटांचे व्यक्तिमत्व देखील त्यांना इतर उद्योजकांपेक्षा वेगळे बनवते. ते अतिशय साधे, विनम्र आणि लोकाभिमुख आहे. त्यांनी आपल्या कंपनीतील कर्मचाऱ्यांना कुटुंबासारखे वागवले आणि त्यांच्यासाठी नेहमी पाठीशी राहिले.

आस्था किशोर पिंपळकर
बी.एस.सी. भाग–२

***

अवकाश संशोधनात भारताची कामगिरी

अवकाश संशोधनात भारताची कामगिरी हा एक विस्तृत आणि रोचक विषय आहे. जो भारतीय अवकाश कार्यक्रमाची विकास कार्यपध्दती आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्थानावर आधारित आहे.

प्रस्तावना :

अवकाश संशोधन हा विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील एक अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. यामुळे केवळ पृथ्वीवरील मानवी जीवनातील विविध बाबी समजून घेता येत नाहीत तर त्या आधारित उपयोजनांमुळे समजून घेता येते.

परिचय :

अवकाश संशोधन किंवा अंतराळ संशोधन हे मानवतेच्या इतिहासातील एक मोठं आणि अत्यंत महत्त्वाचं क्षेत्र आहे. या क्षेत्रात भारताने अनेक चांगली कामगिरी केली आहे. भारताने अवकाशातील विविध मापदंडावर अनेक प्रयोग केले असून विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थशास्त्र, संरक्षण यासारख्या क्षेत्रांमध्ये याचा मोठा प्रभाव पडला आहे. भारताने अंतराळ संशोधन क्षेत्रात एक नवा इतिहास रचला आहे आणि त्यामुळे जगभरात त्यांच्या कामगिरीची प्रशंसा केली जात आहे. भारतीय अवकाश संशोधन संस्था (इस्त्रो) ही भारताच्या अवकाश संशोधनातील मुख्य संस्था आहे.

भारताच्या अवकाश संशोधनाच्या क्षेत्रातील कामगिरीचा इतिहास १९६० च्या दशकाच्या सुरुवातीस सुरु होतो. १९६३ मध्ये भारताने पहिला उपग्रह आर्यभट यशस्वीपणे अवकाशात पाठविला. या उपग्रहाच्या यशस्वी प्रक्षेपणाने भारताच्या अवकाश संशोधनाच्या प्रगतीला एक नवी दिशा दिली. त्यानंतर भारताने अनेक महत्त्वाच्या मोहिमा राबविल्या. या निबंधात भारताच्या अवकाश संशोधनातील विविध माइलस्टोन, भारताच्या योगदानाचे महत्त्व आणि भविष्यातील आव्हाने आणि संधी यांचा सांगोपांग अभ्यास केला जाईल.

भारताची अवकाश संशोधन क्षेत्रातील प्रारंभिक कामगिरी :

भारताच्या अवकाश संशोधनाचा इतिहास १९६०

च्या दशकात सुरु झाला. भारत सरकारने १९६२ मध्ये भारतीय अवकाश संशोधन संस्थेची स्थापना केली. या संस्थेचा उद्देश अवकाशातील संशोधन आणि विकास करणे हा होता. पहिला महत्त्वाचा माइलस्टोन भारताच्या अवकाश संशोधनात १९ एप्रिल १९७५ रोजी घडला. भारतीय उपग्रह आर्यभट हा सोव्हिएत संघाच्या सहकार्याने अवकाशात प्रक्षिप्त करण्यात आला. या उपग्रहामुळे भारताला अवकाशातील संशोधनाच्या क्षेत्रात महत्त्वाची सुरुवात केली.

इस्त्रो आणि त्याची कामगिरी :–

भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्त्रो) ही भारताची प्रमुख अवकाश संशोधन संस्था आहे. इस्त्रो च्या स्थापनेपासून ते आजपर्यंत भारताने अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांची अंमलबजावणी केली आहे. इस्त्रो च्या स्थापनेनंतर भारताने विविध उपग्रह प्रक्षेपण यशस्वीपणे केले. इस्त्रो च्या कामगिरीचे प्रमुख उदाहरण म्हणजे 'चंद्रयान' मोहीम. २००८ मध्ये भारताने चंद्रयान–१ प्रक्षिप्त केले आणि त्याद्वारे चंद्रावर दगड असण्याचा महत्त्वपूर्ण शोध लावला.

चंद्रयान–१ च्या यशस्वी प्रक्षेपणानंतर भारताने आणखी एक मोठा माइलस्टोन गाठला २०१३ मध्ये 'मंगळयान' म्हणजेच ''मंगळ प्रक्षेपण यान'' यशस्वीपणे मंगळ ग्रहावर पाठवले. भारत हा मंगळ ग्रहावर यशस्वीपणे उपग्रह पाठवणारा पहिला आशियाई देश ठरला आहे. हा इस्त्रो च्या क्षमतांचा मोठा पुरावा आहे. याशिवाय भारताने अनेक उपग्रह आणि प्रक्षिप्त यंत्रणा तयार केल्या आहेत.

भारताच्या अवकाश संशोधनाचे फायदे आणि महत्त्व :–

अवकाश संशोधनाच्या क्षेत्रात भारताने केलेली कामगिरी केवळ तंत्रज्ञानाच्या प्रगतीसाठी नाही तर विविध सामाजिक, आर्थिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाची आहे. अवकाश संशोधनामुळे भारताला अनेक फायदे मिळाले आहेत.

१) माहितीचे संकलन :

भारताने प्रक्षिप्त केलेले उपग्रह विविध प्रकारच्या माहित संकलनासाठी वापरले जातात. या उपग्रहांनी कृषी, हवामान, पर्यावरण, हवामानशास्त्र आणि दूरसंचार यासारख्या क्षेत्रात माहिती संकलनाची सोय केली आहे.

२) रक्षा आणि सुरक्षा :

अवकाश संशोधनामुळे भारताच्या सुरक्षा तंत्रज्ञानाची प्रगती करत, संरक्षण उद्योगासाठी उपग्रहाद्वारे प्रक्षिप्त सिस्टीम, रडार, संचार आणि डाटा यासारख्या तंत्रज्ञानांचा वापर केला आहे.

३) अर्थव्यवस्थेचा विकास :

भारतीय अंतराळ कार्यक्रमामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला चालना मिळाली आहे. विविध उपग्रह प्रक्षिप्त करणारे उद्योग आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील नवप्रवर्तनामुळे रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत.

४) वैज्ञानिक शोध :

चंद्र, मंगळ आणि इतर ग्रहांच्या अवकाशातील संशोधनामुळे भारताने अनेक वैज्ञानिक शोध लावले आहेत. यामुळे भारताला ग्लोबल सायन्स आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात एक महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे.

५) आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताने योगदान :

अंतराळ संशोधनाच्या क्षेत्रात भारताने आपला ठसा आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील निर्माण केला आहे. भारताच्या अंतराळ यंत्रणेला जगभरातील विविध देशांकडून प्रशंसा मिळाली आहे. भारताने आपले अंतराळ तंत्रज्ञान आणि प्रक्षिप्त सेवा इतर देशांना पुरवुन एक महत्त्वपूर्ण आंतरराष्ट्रीय भागीदार म्हणून ओळख निर्माण केली आहे. भारताने २०१७ मध्ये एकाच वेळी १०४ उपग्रह प्रक्षिप्त केले, ज्यामुळे तो एकाच वेळी सर्वाधिक उपग्रह प्रक्षिप्त करणारा देश बनला.

भारतीय अंतराळ संशोधनाचे भविष्यातील आव्हाने आणि संधी

भारतीय अंतराळ संशोधनास अनेक आव्हानाचा सामना करावा लागला आहे. तरीही याचे भविष्यातील संदर्भात मोठे योगदान असू शकते. भविष्यात इस्त्रो च्या पुढील कामगिरीमध्ये ज्या प्रमुख क्षेत्रांचा समावेश होईल, ते पुढीलप्रमाणे आहेत.

१. मानव अंतराळ यात्रा :–

भारताने मानव अंतराळ यात्रा करण्याचा दृष्टीने प्रगती केली आहे. भारताच्या ''गगनयान'' कार्यक्रमाच्या माध्यमातुन भारतीय अंतराळ यानाच्या मानव दलाला अवकाशात पाठवण्याची योजना आहे.

२. चंद्रयान–३ आणि मंगळयान–२ :–

भारताने चंद्रावर अधिक खोलवर संशोधन करण्यासाठी चंद्रयान–३ चे प्रक्षेपण करण्याचे ठरवले आहे. तसेच मंगळ ग्रहावर आणखी संशोधन करण्यासाठी मंगळयान–२ चे प्रक्षेपण सुध्दा अपेक्षित आहे.

३. नवीन तंत्रज्ञान :

भारतीय अंतराळ संशोधनाने नवनवीन तंत्रज्ञान विकसित करण्यास सुरुवात केली आहे, जसे की रॉकेटची क्षमता वाढवणे, प्रक्षिप्तांच्या किमती कमी करणे आणि अंतराळातील गती आणि सुसंगतता सुधारणे.

भारताच्या अवकाश संशोधनातील सामाजिक आणि वैज्ञानिक महत्त्व :

भारताचे अवकाश संशोधन क्षेत्र केवळ तांत्रिक आणि औद्योगिक दृष्टीने महत्वाचे नाही तर ते सामाजिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून देखील अत्यंत महत्त्वाचे ठरले आहे. इस्त्रो च्या उपग्रह मिशन्समुळे विविध क्षेत्रामध्ये सामाजिक, आर्थिक आणि वैज्ञानिक सुधारणा साधल्या आहेत. विज्ञान, शेतकरी, आरोग्य, शिक्षण आणि पर्यावरण या सर्व क्षेत्रात अवकाश संशोधनाने अत्याधिक योगदान दिले आहे.

शेती आणि कृषी क्षेत्रातील सुधारणा :

भारताच्या अवकाश संशोधन संस्थेने कृषी क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठी उपग्रह तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. विविध कृषी उपग्रहांद्वारे जमिनीच्या परिस्थितीचा, हवामानाचा आणि पिकांच्या वाढीचा अभ्यास केला जातो. यामुळे शेतकऱ्यांना योग्य वेळी योग्य माहिती मिळते. ज्यामुळे ते अधिक कार्यक्षमतेने शेती करु शकतात. उदा.भारतीय उपग्रह 'रिसेट' चा वापर शेतकरी पिकांच्या वाढीची स्थिती मोजण्यासाठी केला जातो.

आपत्ती व्यवस्थापन :

भारताने आपत्ती व्यवस्थापनासाठी उपग्रह तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात केला आहे. विविध उपग्रहांच्या माध्यमातून समुद्र, नदी आणि कचऱ्यांचे निरीक्षण केले जाते. भूकंप, चक्रीवादळ आणि पूर यासारख्या आपत्तीविषयी सूचना मिळवून भारताच्या आपत्ती व्यवस्थापन प्रणालीला एक नवीन दिशा मिळाली आहे. या उपग्रहांद्वारे मिळालेली माहिती आपत्ती क्षेत्रात तात्काळ मदत पुरवण्यासाठी वापरली जाते.

स्वास्थ क्षेत्रातील योगदान :

भारताचे अवकाश संशोधन क्षेत्र आरोग्याच्या क्षेत्रात देखील योगदान देत आहे. उपग्रह तंत्रज्ञानाचा वापर करुन भारतातील दूरदराज भागांमध्ये लवकरच स्वास्थ्य सेवा पोहोचवता येते. इस्त्रो ने 'टेलिमेडीसीन' आणि 'टेलि एज्युकेशन' यासारख्या योजनाची सुरुवात केली आहे. ज्यामुळे ग्रामीण आणि आदिवासी भागामध्ये आरोग्यसेवा आणि शिक्षणाचा प्रसार होऊ शकतो.

पर्यावरणीय संरक्षण :

भारताचे अवकाश संशोधन पर्यावरणाच्या संरक्षणासाठी देखील महत्त्वपूर्ण आहे. पर्यावरणीय डेटा गोळा करण्यासाठी भारताने उपग्रह प्रक्षिप्त केले आहेत. या उपग्रहाद्वारे वायू आणि जलप्रदूषण, जंगलाचांचा नाश, वनस्पतीच्या नाशाच्या स्थितीचा अभ्यास केला जातो. यामुळे पर्यावरण संरक्षणाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊले उचलता येतात. तसेच भारतीय उपग्रह 'इनसेट' आणि 'कारटोसेट' पर्यावरणीय घटकांचा अभ्यास करत आहेत.

महत्त्वाचे मिशन आणि उपग्रह –

१) चंद्रयान–१

चंद्रयान–१ भारताने पहिले चंद्र मिशन २२ ऑक्टोंबर २००८ रोजी प्रक्षिप्त करण्यात आले. या मिशनने भारताला चंद्रावर यशस्वीपणे स्वदेशी अंतराळ यान पाठवण्याची संधी दिली. चंद्रयान–१ ने चंद्राच्या पृष्ठभागावर पाणी असल्याचा शोध लावला जो संपूर्ण जगात चर्चेचा विषय बनला.

२) मंगळयान

भारताने ५ नोव्हेंबर २०१३ रोजी मंगळ ग्रहावर यशस्वीरित्या 'मंगलयान' पाठवले. याचा मुख्य उद्देश मंगळ ग्रहाच्या वातावरणाचा अभ्यास करणे होता. मंगळयानच्या यशस्वी प्रक्षेपणामुळे भारत जगातील पहिला देश बनला जो पहिल्याच प्रयत्नात मंगळ ग्रहाच्या कक्षेत प्रवेश करु शकला.

३) चंद्रयान–२

भारताचे दुसरे चंद्र मिशन 'चंद्रयान–२' २२ जुलै २०१९ रोजी प्रक्षिप्त करण्यात आले. यामध्ये चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर लँडर 'विक्रम' आणि रोव्हर 'प्रज्ञान' यांचा समावेश होता. जरी लँडरचा संपर्क तुटला तरीही या मिशनने मोठ्या प्रमाणावर डेटा गोळा केला.

४) आंतरराष्ट्रीय सहकार्य :

इस्त्रो ने अनेक देशासोबत अवकाश संशोधनाच्या क्षेत्रात सहकार्य केले आहे. भारताने यशस्वीपणे अनेक उपग्रह प्रक्षिप्त केले आहेत. ज्यात परदेशी उपग्रहाचा समावेश आहे. इस्त्रो ने २०१७ मध्ये १०४ उपग्रह एकाच वेळी प्रक्षिप्त करुन जागतिक विक्रम प्रस्थापित केला.

५) गगन

GAGAN (GPS Aided Geo Augmented) प्रणाली भारतातील एक महत्त्वाची प्रगती आहे. या प्रणालीच्या मदतीने भारताने आपल्या हवाई परिवहन आणि लष्करी ऑपरेशनसाठी उच्च दर्जाचे नेव्हीगेशन प्रणाली तयार केली आहे.

६) नेव्हीगेशन सॅटेलाईट

भारताने "IRNSS" (Indian Regional Novigation Satelites System) सुरु केला. यामुळे भारताला स्वतःचा नेव्हीगेशन सॅटेलाईट नेटवर्क मिळाला आहे. ज्यामुळे भारताच्या हवाई आणि समुद्री दळणवळणावर महत्त्वपूर्ण प्रभाव पडला आहे.

कोमल पी. वंजारी
बी.एस्सी. भाग–२

उद्योजकता हा नोकरीला पर्याय ठरू शकतो का?

तुम्ही कधी विचार केला आहे का, की नोकरीच्या परिघाच्या बाहेरही अनेक संधी असू शकतात. नोकरीमुळे स्थिर उत्पन्न मिळतं, हे खरं आहे. पण त्याचवेळी स्वत:चं काहीतरी सुरु करण्याचा आनंद आणि स्वातंत्र्य वेगळंच असतं. उद्योजकता म्हणजे केवळ व्यवसाय सुरु करणे नाही, तर स्वत:च्या कल्पनांना आकार देऊन कधीतरी मोठं घडवण्याची संधी आहे. नोकरीपेक्षा उद्योजकता वेगळी आणि विशेष का आहे?

स्वतंत्रता आणि निर्णयक्षमता:– कोणत्याही बॉसच्या आदेशावर अवलंबून राहण्याची गरज नाही. तुम्ही तुमचे निर्णय स्वत: घेऊ शकता.

कमाईची अमर्याद संधी :– नोकरीत पगार ठरलेला असतो. पण व्यवसायात मेहनतीनुसार कमाई वाढू शकते.

सर्जनशीलता आणि नाविन्यपूर्णता :– स्वत:च्या कल्पनांना मूर्त स्वरुप देता येत आणि समाजात नवीन काही देण्याची संधी मिळते.

इतरांसाठी रोजगार निर्मिती :– नोकरीत स्वत:च नोकरी मागणारा असतो, पण उद्योजक म्हणून तुम्ही इतरांसाठी संधी निर्माण करु शकता.

स्वत: नाव आणि ओळख तयार करणे :– एक यशस्वी उद्योजक म्हणून समाजात एक वेगळी ओळख निर्माण करता येते.

तुम्हा सर्वांना प्रश्न पडला असेल की, कुठल्या प्रकारे सुरुवात करता येईल? काहीजन छोट्या उद्योगांपासून सुरुवात करतात आणि हळूहळू विस्तार करतात.

काही लोक स्टार्टअप सुरु करुन नवीन तंत्रज्ञान किंवा सेवा विकसित करतात. कृषी क्षेत्रात रस असणाऱ्यासाठी मशरुम शेती, प्रक्रिया उद्योग किंवा सेंद्रिय शेती सारखे उत्तम पर्याय आहेत. ऑनलाईन व्यवसायात रस असेल तर ई–कॉमर्स, डिजिटल कोचिंग, युट्युब किंवा ब्लॉगिंग सारख्या अनेक संधी उपलब्ध आहेत. अशा छोट्या छोट्या गोष्टीमधून आणि स्टार्टअप द्वारे आपल्याला व्यवसाय सुरु करता येतो.

तर आता जाणून घेऊया की सुरुवात कशी करावी? स्वत:ची आवड आणि कौशल्य ओळखलेत तर तुम्हाला कळेल की नेमकं कोणत्या गोष्टीत रस आहे, हे समजून घेता येईल. बाजार संशोधन करणे, यामुळे लोकांना नक्की कोणत्या गोष्टींची गरज आहे याबद्दल कळेल आणि शोध घेता येईल. योग्य नियोजन करणे, योग्य नियोजनांमुळे जाणून घेता येईल की कोणत्या पकारचे खर्च येणार आहेत? सुरुवातीला नफा होईल का? जोखीम काय असतील? हे ठरवता येतील व्यवसाय म्हटल्यावर भांडवल उभारावे लागतील. स्वत:च्या बचतीतून किंवा शासकीय योजनांमधून मदत मिळण्याचा प्रयत्न फायदेशीर ठरु शकतो.

मार्केटिंग आणि नेटवर्कींग करा ज्यामुळे लोकापर्यंत पोहोचण्यासाठी सोशल मीडिया, जाहिराती, प्रदर्शन यांचा समावेश करता येतो.

तर अशा प्रकारे आपण आपलं स्वत:च स्टार्टअप, उद्योग याची सुरुवात करु शकतो. ज्यामुळे आपल्या नवनवीन विचारांना वाव मिळेल आणि इतरांसाठी सुध्दा नोकरीच्या संधी देऊ शकतो. उद्योजकता हा नोकरीला पर्याय नक्कीच ठरु शकतो.

व्यवसाय, उद्योग करायचा म्हटल्यावर जोखीम आणि जबाबदारी असतेच आणि ती निभवावीच लागते. जोखीम असतील पण मार्गही असतील.

नोकरीच्या तुलनेत उद्योजकतेत काही जोखीम असतात. कधी–कधी व्यवसाय तोट्यात जाऊ शकतो, स्पर्धा असू शकते. पण जर तुम्ही जिद्दीने काम केलत आणि योग्य नियोजन केलंत तर हे सगळं पार करणं सहज शक्य आहे. जर तुम्हाला नोकरीपेक्षा स्वत:च्या कल्पनांवर विश्वास ठेवायचा असेल, मोठं स्वप्न पहायचं असेल आणि स्वत:साठीच नव्हे तर इतरांसाठीही संधी निर्माण करायची असेल, तर उद्योजकता हा एक उत्तम मार्ग, पर्याय असू शकतो. मेहनत, चिकाटी आणि धैर्य असेल तर तुम्ही तुमच्या क्षेत्रात एक वेगळ नाव कमवू वा निर्माण करु शकता.

''नोकरी मागण्यापेक्षा, रोजगार निर्माण करण्याचा विचार करा''

सुहानी राजु बुटे
बी.एस्सी. भाग–२

भारतीय ज्ञान परंपरा : भारताचा समृध्द वारसा

भारत हा जगातील सर्वाधिक प्राचीन संस्कृती असणाऱ्या देशांपैकी एक आहे. त्याच्या ज्ञानपरंपरेचा वारसा हजारो वर्षे जुना असून विविध क्षेत्रामध्ये त्याने मोलाची भर घातली आहे. भारतीय ज्ञान परंपरेचे मुलभूत तत्त्व आत्मज्ञान, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि अध्यात्म यांच्यातील समतोल साधण्यात आहे. प्राचीन काळी भारत हा ज्ञान, तत्वज्ञान, गणित, खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र, स्थापत्यशास्त्र, साहित्य, संगीत आणि नाट्यशास्त्र या क्षेत्रामध्ये अग्रगण्य होता.

१) भारतीय ज्ञान परंपरेची वैशिष्टये –

भारतीय ज्ञान परंपरेला तीन महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. वेद, उपनिषदे आणि पुराणे, याशिवाय आयुर्वेद, योग, ज्योतिषशास्त्र, गणित, व्याकरण आणि तत्त्वज्ञान यांचाही मोठा वाटा आहे. भारतीय ज्ञान परंपरा केवळ पुस्तकापुरती मर्यादित नव्हती, तर ती गुरु–शिष्य परंपरेचा माध्यमातून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होत गेली.

२) वेद आणि उपनिषदे :–

वेद हे भारतीय ज्ञानपरंपरेचे प्राचीनतम आणि मुलभूत ग्रंथ मानले जातात. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अर्थवेद हे चार वेद ज्ञानाच्या विविध क्षेत्रांचे प्रतिनिधीत्व करतात. वेदांमध्ये ब्रह्मांड, नैसर्गिक नियम आणि मानवी जीवनविषयक तत्त्वज्ञान आहे. उपनिषदे ही वेदांचा गूढार्थ उलगडणारी ग्रंथसंपदा असून, त्यातून अद्वैत, द्वैत आणि विशिष्टाद्वैत तत्त्वज्ञानाचा उगम झाला.

३) पुराणे आणि इतर ग्रंथ –

पुराणे आणि महाकाव्ये म्हणजेच रामायण आणि महाभारत हे भारतीय संस्कृती आणि ज्ञानपरंपरेचे अभिन्न भाग आहेत. महाभारतातील ''भगवद्गीता'' ही आत्मज्ञान, कर्मयोग आणि भक्तियोग यासाठी मार्गदर्शक मानली जाते.

विज्ञान आणि गणितातील योगदान –

भारताने गणित, खगोलशास्त्र आणि विज्ञानाच्या विविध शाखांमध्ये अतुलनीय योगदान दिले आहे.

१) शून्याचा शोध आणि गणितातील महत्त्वपूर्ण शोध

भारतीय गणितज्ञ आर्यभट यांनी 'शून्य' या संकल्पनेचा शोध लावला. ज्यामुळे संख्याशास्त्रात क्रांती घडली. तसेच दशमान पध्दत, त्रिकोणामिती आणि बिजगणित यासारख्या संकल्पना भारतातुन जगभर पसरल्या. ब्रह्मगुप्त, भास्कराचार्य आणि वराहमिहीर हेही महान गणितज्ञ होते.

* आर्यभट यांनी पृथ्वी स्वत:भोवती फिरते आणि ती सुर्याभोवती परिभ्रमण करते हे सिध्द केले. त्यांनी ''पाय'' अचूक किंमत आणि ग्रहणाची कारणेही सांगितली. भारतीय पंचागांची रचना खगोलशास्त्राच्या सखोल अभ्यासावर आधारित आहे.

आयुर्वेद ही भारताची प्राचीन वैद्यकीय प्रणाली आहे. जी शरीर मन आणि आत्म्याच्या संतुलनावर आधारित आहे. चरकसंहिता आणि सुश्रुतसंहिता हे आयुर्वेदाचे महत्त्वाचे ग्रंथ आहेत.

योग हा भारताने जगाला दिलेला अमूल्य ठेवा आहे. योगसूत्रांचे जनक पतंजली होते. योगासनामुळे शरीर आणि मन निरोगी राहते. आज संपूर्ण जगभर योगाची लोकप्रियता वाढली आहे आणि आंतरराष्ट्रीय योगदिन (२१ जून) हा भारताच्या ज्ञानपरंपरेच्या जागतिक स्वीकृतीचा साक्षीदार आहे.

२) संस्कृत साहित्य आणि व्याकरण –

संस्कृत ही भारतीय ज्ञानपरंपरेची प्रमुख भाषा आहे. पाणिनी यांनी व्याकरणाचे नियम मांडले, जे जगातील सर्वात प्रगत व्याकरणीय प्रणालीपैकी एक आहे. कालीदास , भास, बाणभट्ट यासारख्या साहित्यकांनी संस्कृत साहित्य समृद्ध केले.

३) भारतीय संगीत आणि नाट्यशास्त्र

भारतीय संगीताचा उगम सामवेदात आहे. भरत मुनिनी लिहिलेल 'नाट्यशास्त्र' हे नाट्यकला आणि अभिनयासाठी मार्गदर्शक मानले जाते. भारतीय शास्त्रीय संगीत मुख्यत: हिंदुस्थानी आणि कर्नाटकी अशा दोन प्रकारात विभागले आहे.

भारतीय ज्ञान परंपरेचा आधुनिक जगावर प्रभाव :–

भारतीय ज्ञानपरंपरेचा प्रभाव आजही जगभर पाहायला मिळतो. विज्ञान, तंत्रज्ञान, तत्वज्ञान, योग आणि वैद्यकशास्त्र या क्षेत्रामध्ये भारताने दिलेल्या योगदानाचा आधुनिक जग उपयोग करीत आहे. नासा आणि इतर वैज्ञनिक संस्थांमध्ये भारतीय गणितज्ञ आणि शास्त्रज्ञ महत्वाची भूमिका बजावत आहेत. भारतीय तत्वज्ञानाचे प्रभावी तत्व जगभरातील व्यक्तींना मार्गदर्शन करत आहेत. स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी आणि श्री अरविंद यांच्या विचारांनी जागतिक पातळीवर प्रेरणा दिली आहे.

भारतीय ज्ञान परंपरा ही केवळ भुतकाळापुरती मर्यादित नाही, तर ती भविष्यातील प्रगतीसाठी आधारस्तंभ आहे. वेद, उपनिषदे, आयुर्वेद, गणित, विज्ञान, तत्त्वज्ञान आणि कला यांचा संगम असलेली ही परंपरा मानवजातीच्या उन्नतीसाठी मार्गदर्शक ठरली आहे. आधुनिक काळातील भारतीय ज्ञानपरंपरेचा वारसा जतन करणे आणि त्याचा प्रसार करणे ही जबाबदारी आहे.

वैष्णवी प्रदीप दरणे
बी.एस्सी. भाग–२

श्री. भार्गव सरांचे व्यक्तीमत्व

महाविद्यालयातील सर्व शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मित्रांनो, मला भार्गव सरांचे व्यक्तीमत्व कसे वाटले किंवा माझ्या दृष्टिकोनातून मला सर कसे दिसले ते मी तुम्हाला एका छोट्याशा गोष्टीच्या स्वरुपात सांगणार आहे.

माझ्या व सरांचा जो काही संबंध कार्यालयीन कामकाजाच्या स्वरूपाने किंवा महाविद्यालयात असणाऱ्या सीडीसी व शाळा समितीची मीटिंगच्या निमित्ताने काही अल्पसा संवाद माझा झाला, त्यातून मला सरांच्या व्यक्तित्वाचा वेध घेता आला.

एकदा श्री. रतन टाटा यांना भेटायला चौकेर नावाचे अधिकारी गेले होते. त्यांना एका प्रोजेक्टच्या संदर्भात टाटांचे मत जाणून घ्यायचे होते. ते त्यांच्या केबिनमध्ये गेले व त्यांनी प्रोजेक्टची माहिती सांगितली व ते शांत झाले. श्री टाटांनी एक क्षण त्यांच्याकडे पाहिले व त्यांना तीन प्रश्न विचारले. पहिला प्रश्न आर यु लिगली राईट? श्री. चौकेर साहेबांनी उत्तर दिले यस सर. मग टाटांनी दुसरा प्रश्न विचारला आर यु इथिकली राईट? श्री. चौकेर साहेबांनी उत्तर दिले यस सर. मग तिसरा प्रश्न विचारला आर यू मॉरली राईट? तर तेथे चौकेर साहेब म्हणतात मी खूप गोंधळलो होतो. कारण मला इथिकली राईट व मॉरली राईट यांच्या मधला नेमका अर्थ माहित नव्हता व मी घाईघाईत यस सर म्हणालो. तर मग टाटांनी मला संमती दिली ओके गो अहेड. परंतु चौकेर साहेब म्हणतात मी खूप गोंधळलो होतो. की आपण एवढ्या मोठ्या व्यक्तीला यस सर म्हणालो. तर मी सर्वात प्रथम त्यांच्या केबिनच्या बाहेर आल्यावर या दोन वाक्यामधील नेमका अर्थ काय तो शोधला. पहिला प्रश्न आर यु लीगली राईट? म्हणजे जे काही समाजाचे, शासनाचे नियम आहे त्या नियमाच्या अधीन राहून काम करणे. दुसरा प्रश्न होता इथिकली राईट? म्हणजे संस्था सुद्धा काही मूल्य व तत्त्वांवर काम करीत असते. आपण सुद्धा शिक्षा मंडळ मध्ये काम करतो. शिक्षा मंडळ सुद्धा काही मूल्य व तत्त्वावर काम करते. त्या मूल्यांना, त्या तत्त्वांना कोणतीही हानी न पोहोचविता काम करणे. हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. कारण आपण सुद्धा शिक्षा मंडळ सारख्या संस्थेत काम करतो आणि तिसरा प्रश्न मॉरली राईट म्हणजे आपली नैतिक जबाबदारी काय आहे? मित्रांनो आपण सगळ्यांनी जर आपली नैतिक जबाबदारी ओळखून काम केले तर तुम्ही काम करीत नाही. असे कोणीही तुम्हाला म्हणणार नाही. सरांचे काम पाहताना सरांनी ज्या पद्धतीने जबाबदारीने शिक्षा मंडळ व महाविद्यालयाचा विकास केला तो अतुलनीय आहे. आपण सर्वांनी आपली नैतिक जबाबदारी ओळखून काम केले तर आपण आपली प्रगती तर करूच, परंतु सोबतच महाविद्यालय, संस्था व देशाच्या प्रगतीस सुद्धा हातभार लावत आहोत असे मला वाटते. तर सरांचं व्यक्तिमत्व या प्रकारचे आहे असं मला वाटतं.

श्री. गजानन ढोले
सेवानिवृत्त शिक्षकेतर कर्मचारी

***

कविता

समाजमाध्यमे आणि शिक्षण
समाज माध्यमे शिक्षणात एक नवा प्रकाश,
ज्ञानाची गंगा वाहते, विचारांचा विस्तार
विद्यार्थ्यांच्या मनात, उगवते एक स्वप्न,
शिक्षणाच्या या वाटेवर, मिळते नवे ज्ञान

ट्रविट्स, पोस्ट्स आणि व्हिडिओचा साठा
शिक्षकांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांचा साथ,
संपर्क साधता येतो, दूरच्या मित्रांशी,
ज्ञानाची देवाणघेवाण, होते सहज सृष्टीशी.

गट, चर्चा, फोरम, विचारांची उधळण,
सर्वांना मिळतो आवाज, शिक्षणात एकत्रण.
सामाजिक कौशल्ये, इथे विकसित होतात,
सहकार्याची भावना, मनात रुजवतात

पण सावध राहावे, लक्ष विचलित होईल,
खोटी माहिती येईल, शिक्षणावर परिणाम करील
संतुलन साधणे आवश्यक, ज्ञानाची गती,
समाज माध्यमांचा वापर, करावा योग्य पध्दती
शिक्षणाच्या या युगात, समाज माध्यमांचा ठसा,
ज्ञानाची वाटचाल, एकत्रित करती सदा.
शिक्षणात नवे वारे, नवे विचार येतात.
समाज माध्यमे आहेत. शिक्षणाचे नवे गाठ.

संपर्क साधता येतो, दूरदर्शनाच्या पार,
शिक्षणाच्या या युगात, सर्वत्र आहे आधार
सामाजिक मुद्दे, विचारांची देवाणघेवाण,
समाज माध्यमांनी दिला शिक्षणाला नवा आयाम.

शिक्षणाची ही गती, समाज माध्यमांनी वाढवली,
ज्ञानाच्या या प्रवासात, सर्वांनी एकत्रित चालवली
समाज माध्यमे, ज्ञानाचे एक महत्वाचे साधन,
शिक्षणाच्या क्षेत्रात, त्यांची भूमिका आहे महान.

अक्षदा गजानन पिंजरकर
बी.एस्सी. भाग–२

हिन्दी
विभाग

अंतरिक्ष संशोधन में भारत का योगदान

''तोड़ दो यह क्षितिज मैं भी देख लूँ उस पार क्या है,
जहाँ रहे जिस पंथ से युग कल्प उसका छोर क्या है ।
सिंधु की नि:सीमता पर लहर का लाश कैसा
दीप लघु शिर पर धरे आलोक का आकाश कैसा''

सभ्यता की शुरुवात से ही मानव अंतरिक्ष की रोमांचक कल्पनाएँ करता रहा है । इस रोमांचक कल्पनाओं में अंतरिक्ष कभी अध्यात्म का विषय बना तो कभी कविताओं और दंत–कथा का पारलौकिक कथानक से प्रभावित होकर कभी मानव ने अपनी कल्पना के स्वर्ग और नरक अंतरिक्ष में स्थापित कर दिये तो कभी मानवता के प्रभाव में आकर पृथ्वी को केंद्र में रखा ओर अंतरिक्ष को उसकी परिधी मान लिया । धीरे–धीरे जन–सभ्यता का विकास हुआ तो मानव ने अंतरिक्ष के रहस्यों को समझने के लिये प्रेक्षण यंत्र जमाऐ जिनमें दुरबीन प्रमुख थी । इसके बाद प्रारम्भ हुआ विज्ञान के माध्यम से अंतरिक्ष को समझने का प्रयास ।

इस क्रम में आर्यभट्ट से लेकर गैलिलियो एवं न्यूटन तक प्रयास होते रहे । आधुनिक अंतरिक्ष विज्ञान का विकास हुआ, जो आज इतना परिपक्व हो गया है कि हम मानव को अंतरिक्ष में भेजने के साथ अंतरिक्ष पर्यटन एवं अंतरिक्ष में कॉलोनियॉ बसाने की भी कल्पना करने लगे है ।

भारत में आधुनिक अंतरिक्ष कार्यक्रम के जनक डॉ. विक्रम साराभाई थे । भारतीय कार्यक्रम का प्राथमिक उद्देश्य राष्ट्रीय हित में अंतरिक्ष तकनीक एवं उसके अनुप्रयोगों का विकास करना है । भारत ने जब अपने अंतरिक्ष कार्यक्रम की शुरुवात की थी तो कई विकसित देशों ने इसका मजाक बनाया था, परंतु भारत ने अपने कम बजट में भी उच्च अंतरिक्ष तकनीक को हासिल करने में सफलता प्राप्त की और आज वह श्रेष्ठ अंतरिक्ष तकनीक वाले देशों की कतार में शामिल है ।

भारतीय अंतरिक्ष अनुसंधान संगठन

* वर्ष १९६९ में भारतीय अंतरिक्ष अनुसंधान संस्थान (इसरो) की स्थापना हुई । यह भारत सरकार की अंतरिक्ष एजेंसी है और इसका मुख्यालय बंगलुरु में है ।

* इसरो अपने विभिन्न केंद्रो के देशव्यापी नेटवर्क के माध्यम से संचलित होता है ।

भारत की अंतरिक्ष यात्रा की कहानी अधिक पुरानी नही । वह सन १९७० से आरंभ होती है । सेवियत भूमि से भारत ने जब उपग्रह आर्यभट्ट को अंतरिक्ष की कक्षा में सफलतापुर्वक पहुंचाया तो सारे संसार ने उनके वैज्ञानिकों की प्रतिभा का लोहा तत्काल मान लिया । इसके बाद यह क्रम निरंतर आगे बढता गया, १९८१ में भारत ने फ्रांस की भूमि में 'एप्पल' नाम का उपग्रह तथा अमेरिका से इनसेट–१ए छोड़ा । यदयपि ये बाद के उपग्रह योजना के अनुरुप सफल न हो सके, पर यह तो विश्व के देशों के सामने प्रमाणित हो ही गया कि भारत इस क्षेत्र में अब यह सभी कुछ कर पाने में समर्थ है, जो समुन्नत एवं विकसित देश कर रहे एवं कर सकते है । १९८१ मे एप्पल के बाद छोड़ा गया 'भास्कर' द्वितीय उपग्रह आज भी अंतरिक्ष में सक्रीय रहकर योजनाबद्ध रुप से वैज्ञानिक उपयोग की सूचनांए भेज रहा है । इसके बाद सन १९८३ में 'रोहिणी' उपग्रहों के अंतरिक्ष–प्रेक्षपण का कार्यक्रम आरंभ हुआ । अभी तक इस श्रृखंला में कई उपग्रह सफलतापुर्वक अंतरिक्ष में भेजे जा चुके है । इससे अंतरिक्ष विज्ञान में भारत की निरंतर प्रगति एवं सफलता का सहज अनुमान प्रत्येक व्यक्ति स्वंय ही लगा सकता है कुछ असफलताएँ प्रेरणा देकर आगे बढ़ानेवाली ही प्रमाणित हुई हैं, पीछे हटने वाली कदापि नहीं ।

अंतरिक्ष–विज्ञान के क्षेत्र में भारत के कदम केवल मानव–रहित उपग्रह–प्रेक्षपण तक नहीं रुके रहे, बल्कि इससे कहीं आगे बढ़ चुके हैं । भारत–रुस संयुक्त सहयोग से भारत के स्कवॉड्रन लीडर राकेश शर्मा सन १९८४ के आरंभ में अंतरिक्ष यात्रा भी कर आए है । इसके लिए उन्हें अपने एक साथी विंग कमांडर रवीश मल्होत्रा के साथ सेवियत रुस में गहन प्रशिक्षण लेना पेड़ा । रुसी भाषा तो सीखनी ही पेड़ी–अंतरिक्ष की विभिन्न, विषय और परस्पर विपरित परिस्थितियों मे रह पाने का कठोर अभ्यास भी करना पड़ा । उसके बाद राकेश शर्मा को अंतरिक्ष उडान के योग्य समझा गया और वे अपनी यह पहली यात्रा सफलतापूर्वक करके भारत के पहले अंतरिक्ष यात्री होने का गौरव प्राप्त कर सके ।

जब प्रधानम ने पूछा – ' अंतरिक्ष से भारत कैसा लगा था दिखाई पड़ रहा है? तो स्क्वॉड्रन लीडर राकेश शर्मा ने उत्तर दिया 'सारे जहा से अच्छा, यह उत्तर प्रत्येक भारतीय जन की राष्ट्रीय मानसिकता का प्रतीक और परिचायक कहा जा सकता है ।

* अंतरिक्ष अनुसंधान के लिए अलग से बजट का आवंटन :– भारत सरकार ने अंतरिक्ष अनुसंधान के लिए अलग से बजट का आवंटन किया है, जिससे इसरो को अपने मिशनों को और अधिक प्रभावी ढंग से पूरा करने में मदत मिली है ।

* नई प्रतियोगिताओं का विकास :– इसरो ने नई प्रतियोगितायों का विकास किया है, जैसे की प्रायोजनिक इंजन और राकेट बुस्टर, जो भारत को अंतरिक्ष अनुसंधान में और अधिक आत्मनिर्भर बनाने में मदत मिली है ।

* आंतरराष्ट्रीय सहयोग :– भारत में अनुसंधान में अंतराष्ट्रीय सहयोग को बढ़ावा दिया है, जिससे देश को वैश्विक स्तर पर अपनी क्षमताओं को बढ़ाने मे मदत मिली है ।

इन संशोधनों के परिणाम स्वरुप भारत ने अंतरिक्ष अनुसंधान मे महत्वपूर्ण प्रगति की है और देश को वैश्विक स्तर पर एक प्रमुख अंतरिक्ष शक्ति के रुप में स्थापित किया है ।

खुशाली नरेंद्र कोपरकर
बी.एस.सी. भाग–२

***

उद्योजकता : नौकरी क्षेत्र का विकल्प हो सकता है क्या :

उद्योजकता आजकल बहुत चर्चा में है । यह एक ऐसा मार्ग है जिसमे आप अपने विचारों और जुनून को व्यवसाय में बदल सकते हैं ।

उद्योजकता के लिए कई फायदे है । सबसे पहले यह आपको अपने व्यवसाय को अपने तरीके से चलाने की स्वतंत्रता देती है । आप अपने विचारों और सपनों को पूरा कर सकते है । इसके अलावा उद्योजकता आपको अपने व्यवसाय से लाभ कमाने का अवसर प्रदान करती है हालांकि उद्योजकता की कुछ चुनौतियाँ भी है । सबसे पहले व्यवसाय शुरु करने में जोखिम शामिल है आपको अपने व्यवसाय के लिए आवश्यक संसाधनों की पहचान करनी होगी और उन्हे प्राप्त करने के लिए कड़ी मेहनत करनी होगी । इसके अलावा व्यवसाय चलाने में अनिश्चितता शामिल है । आपको अपने व्यवसाय की सफलता के लिए नए और अपनी पसंद के व्यवसाय की खोज करनी होगी ।

उद्योजकता के सबसे पहले आपको अपने व्यवसाय के लिए एक स्पष्ट दृष्टिकोण और मजबूत योजना की आवश्यकता होगी आपको अपने व्यवसाय के लिए आवश्यक संसाधनों की पहचान करनी होगी और उन्हे प्राप्त करने के लिए कड़ी मेहनत करनी होगी इसके अलावा आपको अपने व्यवसाय को बढाने के लिए नए तरीकों की खोज करनी होगी ।

उद्योजकता : के कुछ मुख्य पहलू –

१) व्यवसाय योजना : एक व्यवसाय योजना बनाना जो आपके व्यवसाय के उद्देश्य लक्ष्य और रणनीति को परिभाषित करता है ।

२) वित्तीय प्रबंधन करना : अपने व्यवसाय के लिए वित्तीय संसाधनों का प्रबंधन करना और अपने व्यवसाय को वित्तीय रुप से स्थिर बनाना ।

३) बाजार अनुसंधान : अपने उत्पाद के लिए बाजार का अनुसंधान करना और अपने व्यवसाय को बाजार की मांग के अनुसार ढालना ।

४) उत्पाद या सेवा विकास : अपने उत्पाद को बाजार में प्रचारित करना और अपने व्यवसाय को बढावा देना ।

उद्योजकता के कुछ मुख्य लाभ है :

१) स्वतंत्रता : अपने व्यवसाय को अपने तरिके से चलाने की स्वतंत्रता

२) लाभ : अपने व्यवसाय से लाभ कमाने का अवसर

३) नवाचा : नए उत्पादों और सेवाओ को विकसीत करने का अवसर

४) नोकर सुजन : अन्य लोगों को नोकरी देने का अवसर

उद्योजकता :– के लिए कुछ आवश्यक गुण है ।

उद्योजकता वास्तव में नौकरी क्षेत्र का विकल्प हो सकता है । लेकिन यह एक आसान मार्ग नही है । आपको अपने व्यवसाय के लिए एक स्पष्ट दृष्टिकोन और एक मजबुत योजना की आवश्यकता होगी । आपको अपने व्यवसाय के लिए आवश्यक संसाधनो की पहचान करनी होगी और उन्हें प्राप्त करने के लिए कडी मेहनत करनी होगी । इसके अलावा आपको अपने व्यवसाय को बढाने के लिए नए और नवीन तरीको की खोज करनी होगी और अपने व्यवसाय की सफलता के लिए कडी मेहनत करनी होगी ।

भाग्यश्री फटींग
बी.एस्सी. भाग–२

मानवी आचरण मे संस्कृति का महत्त्व

व्यक्ति के जीवन में आचरण का विशेष महत्व है । श्रेष्ठ आचरण से व्यक्ति का बहुमुखी विकास होता है । अच्छा इंसान बनने के साथ–साथ वह भगवत् प्राप्ति की तरफ अग्रेसर हो सकता है । मानव योनि मे जन्म मिलना भी तभी संभव होता है जब परमात्मा की अनंत इच्छा होती है । इसे व्यर्थ नहीं गवांए । खाली हाथ मनुष्य इस संसार में आता है और रोता बिलखता, खाली हाथ ही चला ही जाता है । उसका सारा ताना–बाना यहीं रखा रह जाता है।

पापों की गठरी इतनी भारी हो जाती है कि एक दिन जब काल सामने होता है तो उसके पास पश्चाताप के अतिरिक्त और कुछ नहीं रह जाता। इसलिए समय रहते ही अपने आचरण को ठीक करने के लिए सद्गुणों को बेढ़ाने का प्रयास करें ताकि इस संसार से बिदा होने के बाद भी लोग सूरदास, तुलसी, कबीर और मीरा की तरह आपको याद करें । बुद्ध, नानक और महावीर आज अपने सतकर्मो की वजह से आज अमर है । इन सबने सबसे पहले अपने अंदर सदाचरण का वीज बोया । अपने आचार–विचार को ठीक किया और साबित कर दिया कि सदाचरण के सहारे व्यक्ति जीवन में ऊंचाई की तरफ सहज ही अग्रसर हो सकता है । इसलिए अपने इस अमूल्य जीवन की सार्थकता को समझें । सदाचारी रहकर उसे यह भी ध्यान रखना जरूरी है कि ईमानदारी और मेहनत से कमाई करता है । यह शरीर एक मंदिर है । इसलिए इसे बुरे व्यसनों से बचाते हुए इसकी देख–रेख बढ़िया ढंग से करें । यह शरीर मानव सेवा और समाज सेवा में लगा रहे, इसके लिए अस्वस्थकर पदार्थो का सेवन कर इसे बर्बाद न करें ।

जो विवेकी है वे अपनी शक्ति और धन को भले कार्यो मे लगाते हैं । माना कि इस संसार में व्यक्ति को अपना जीवन आनंदपूर्वक जीना चाहिए, प्रकृति प्रदत्त सुख–सुविधाओं का लाभ भी उठाना चाहिए । लेकिन भूलकर भी जीवन में कुत्सित विचारों और विषय–वासनाओं को पनपने नहीं देना चाहिए । जो जीवन में धैर्य और संयम के साथ जीते है और जिनके विचार और चिंतन शुभ होते है वे एक न एक दिन परमात्मा की शरण में पहुंच जाते है । जो भी सत्ता, संपत्ति, सत्कार जीवन में मिलता है । उसे देनेवाला एक न एक दिन जरुर वापस ले लेता है । इससे दुखी नहीं होना चाहिए । ऐसा इसलिए, क्योंकि यहीं अंतिम सत्य है । यदि कुछ रह जाता है तो आपके शुभ कर्म और आपका सदाचरण। जिसका आचरण जितना अच्छा है, वह परमात्मा के उतना ही करीब है। संस्कृति जीवन जीने की कला हैं। संस्कृति हमारे जीने और सोचने की विधी में हमारी अंत:स्थ प्रकृति की अभिव्यक्त है। सभ्यता और संस्कृति को समानार्थी समझ लिया जाता है, जबकि ये दोनों अवधारणाएं अलग–अलग है ।

संसार के सभी विद्वानों ने संस्कृति शब्द की विभिन्न परिभाषाएं की है । कोई सर्वमान्य परिभाषा नहीं मिल पाती फिर भी इतना तो स्पष्ट ही है कि 'संस्कृति' उन भूषणारुपी सम्यक चेष्टाओं का नाम है जिनके द्वारा मानव समूह अपने आंतरिक और बाह्य जीवन को अपनी शारीरिक, मानसिक शक्तियों को संस्कारवान विकसीत और दृढ बनाता है । संक्षेप में संस्कृति मानव समुदाय के जीवन–व्यापन की वह परंपरागत किंतु निरंतर विकासोन्मुखी शैली है जिसका प्रशिक्षण पाकर मनुष्य संस्कारित, सुधड, प्रौढ और विकसित बनता है ।

भारतीय संस्कृती की विशेषताएं :– भारतीय संस्कृति जीवन–दर्शन, व्यक्तिगत और सामुदायिक विशेषताओं, भूगोल, ज्ञान–विज्ञान के विकास के विकास क्रम, विभिन्न समाज, जातियों के कारण बहुत विशिष्ट है । इसमें भिन्नता–विभिन्नता, सहजता और स्वाभाविकता है । हमारी भारतीय संस्कृति सार्वभौमिक सत्यों पर खड़ी है इसी कारण यह गतिशील होती है । कोई भी संस्कृति की अमरता इस बात पर भी निर्भर करती है कि वह कितनी विकासोन्मुखी है । जिस संस्कृति में युग की मांग के अनुसार विकसित और रुपांतरित होने की क्षमता नही होती, वह पिछड जाती है । भारतीय संस्कृति आत्मा को ही मुख्य मानती है । शरीर और मन की शुद्धि भी आवश्यक है । जब तक मनुष्य का बाह्य तथा अंतर शुद्ध नही होता तब तक वह त्रृटिपूर्ण विचारों को भी सही मानता रहेगा ।

भारतीय संस्कृति का विकास धर्म का आधार लेकर हुआ है । इसीलिए उसमें दृढता है । भारतीय संस्कृति व्यक्ति को व्यक्तित्व देती है और उसे महान कार्यों के लिए प्रोत्साहित करती है किंतु व्यक्तित्व का चरम विकास यह सामाजिक स्तर पर ही स्वीकार करती है ।

अनामिका दिनकर अगडे
बी.एस्सी. भाग–२

मानसिक आरोग्य का महत्त्व



मानसिक आरोग्य हमारे संपूर्ण स्वास्थ का एक महत्वपूर्ण पहलू है । खासकर युवाओं के लिए । यह केवल मानसिक रोगो से मुक्ति ही नहीं, बल्कि मानसिक संतुलन, आत्मविश्वास, सकारात्मक सोच और तनाव प्रबंधन कि क्षमता से जुडा होता है । वर्तमान समय में प्रतिस्पर्धा, करिअर कि चिंता, सामाजिक दबाव और डिजिटल दुनिया की अत्याधिक भागीदारी के कारण युवाओं मे मानसिक समस्याएँ बढ रही हैं । इसीलिए मानसिक आरोग्य को बनाए रखना अत्यंत आवश्यक हो गया है । मानसिक स्वास्थ केवल मानसिक बिमारियो की अनुपस्थिती नहीं है, बल्कि यह एक व्यक्ति के भावनात्मक मनोवैज्ञानिक और सामाजिक कल्याण का प्रतिक है ।

आज की तेज रफ्तार जिंदगी, प्रतिस्पर्धा सोशल मीडिया का दबाव और व्यक्तिगत चुनौतियां युवाओं के मानसिक स्वास्थ पर प्रभाव डालती है । युवाओं में मानसिक बीमारियों का बढता प्रचलन कुछ ऐसा है कि, विश्व संगठन के अनुसार हर ७ में से १ युवा आरोग्य मानसिक स्वास्थ तथा आरोग्य से जूझता है । इसमें डिप्रेशन, तनाव और एंजॉयमेंट जैसे मुद्दे मुख्य है । सामाजिक दबाव में आकर युवा अक्सर अपनी पढाई, करिअर और सामाजिक जीवन में संतुलन बनाने के लिए संघर्ष करते हैं । यह दबाव उनकी मानसिक स्थिती व उनके आरोग्य को जटिल बना देता है । डिजिटल युग का प्रभाव उनके मानसिक आरोग्य को ही नही, शारिरीक आरोग्य को भी सहि पहुचा कर रहा है ।

सोशल मीडिया पर दिखनेवाले 'परफेक्ट' जीवन की छवी युवाओं में आत्म-संदेह और हीन भावना को जन्म देती है । साइबर बुलिंग और सोशल मीडिया की लत भी मानसिक आरोग्य को प्रभावित करते हैं । कोविड-१९ का प्रभाव युवाओं पर बेहद हुआ है । महामारी के दौरान, सामाजिक अलगाव, आर्थिक अनिश्चिता और शिक्षा मे रुकावट ने युवाओं के मानसिक स्वास्थ पर गंभीर प्रभाव डाला । नौकरी के लिए युवाओं को युध्द के समान लडना पडा । मानसिक स्वास्थ पर प्रभाव डालने वाले कुछ प्रमुख कारक भी है । जैसे, परिवारिक और सामाजिक समर्थन-परिवार और दोस्तों से मिलने वाला भावनात्मक समर्थन, मानसिक स्वास्थ को मजबूत करता है । समर्थन की कमी मानसिक समस्याओं को बढा सकती है । आर्थिक स्थिती भी आर्थिक तनाव और बेरोजगारी मानसिक आरोग्य पर नकारात्मक प्रभाव डालते है । युवाओ के मानसिक आरोग्य का संबंध आधुनिक जीवनशैली से है, जैसे पर्याप्त नींद की कमी, खान-पान और व्यायाम की कमी मानसिक आरोग्य को कमजोर कर सकती है । मानसिक रुप से स्वास्थ युवा जीवन मे बेहतर निर्णय ले सकते हैं । चुनौतियों का सामना करने में सक्षम होते है । मानसिक आरोग्य तथा स्वास्थ का असर सीधा शारिरीक आरोग्य पर पडता है । तनाव और चिंता से हृदय विकार, उच्चरक्तचाप और कमजोर प्रतिरक्षा प्रणाली हार्टअटैक, मॅनिक अटैक जैसी समस्याएं हो सकती है । मानसिक रुप मे स्वस्थ व्यक्ति अपने परिवार, दोस्तों और सहकर्मियों के साथ बेहतर संबंध बना सकता है । मानसिक रुप में स्थिर युवा अपने कार्यक्षेत्र में अधिक उत्पादक और रचनात्मक होते है । मानसिक रुप से स्वास्थ युवा समाज में सकारात्मक बदलाव लाने में सक्षम होते हैं ।

भुमिका ईश्वरराव रेवतकर
बी.एस.सी. भाग-२

शिक्षा के क्षेत्र मे सोशल मीडिया की भूमिका

सोशल मीडिया शब्दकोश की परिभाषा के अनुसार 'सोशल मीडिया ऐसी वेबसाईट और अप्लिकेशन है जो उपयोगकर्ता को सामग्री बनाने और साझा करने या सोशल नेटवर्किंग में भाग लेने में सक्षम बनाती है ।

शिक्षा संस्थान मिडिया को अपने सिस्टम मे अपना रहे है और छात्र जीवन को बेहतर बनाने के लिए समूह संसाधनो और तंत्रो पर भरोसा कर रहे हैं । शिक्षा मे सोशल मिडीया का उपयोग छात्रों, शिक्षकों और अभिभावकों को अधिक उपयोगी जानकारी प्राप्त करने, शिक्षण समूहों और अन्य शैक्षिक प्रणालियों से जुडने में मदत करता हैं । जो शिक्षा को सुविधाजनक बनाते है ।

